मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २४७ ■ बुधवार, २० मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# भव्य-दिव्य आणि दिमाखदार आयोजनात कामोठेत रंगली 'मिनी महाराष्ट्र केसरी'

## परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जंगी कुस्ती स्पर्धेला हजारोंचा प्रतिसाद







**दैनिक युवक आधार**

**पनवेल (हरेश साठे)** : महाराष्ट्राच्या पारंपरिक कुस्ती संस्कृतीचा थरार, हजारो क्रीडाप्रेमींची उपस्थिती, मातीतल्या लढतींचा जल्लोष आणि भव्य-दिव्य आयोजनाचा दिमाख... अशा उत्साहपूर्ण वातावरणात कामोठे येथे "मा. श्री. परेशशेठ ठाकूर केसरी २०२६" हि जंगी कुस्ती स्पर्धा शानदारपणे पार पडली. भाजपचे युवा नेते, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा कामोठे आणि रायगड जिल्हा कुस्ती असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कामोठे सेक्टर ०६ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाच्या भव्य मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेने अक्षरशः "मिनी महाराष्ट्र केसरी"चा अनुभव उपस्थितांना दिला. नेपाळ, महाराष्ट्र राज्यासह पंजाब, हरियाणा, उत्तर प्रदेश, दिल्ली आणि इतर राज्यांतील नामांकित मल्लांनी सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात कुस्तीचा जल्लोष पाहायला मिळाला. यामधील मुख्य स्पर्धेतील विजेत्यांना मानाची गदा आणि रोख रक्कम पारितोषिक देऊन सन्मानित आले.

या कुस्ती सामन्यांचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, मावळ मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे, भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती लाभली. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, नवी मुंबई महापालिकेच्या महापौर सुजाता पाटील, महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपमहापौर प्रमिला पाटील, उपसभापती भूपेंद्र पाटील, खालापूर पंचायत समितीचे सभापती कृष्णा पारंगे, खोपोली महापालिकेचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार, स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, पेण नगरपरिषदेचे गटनेते अनिरुद्ध पाटील, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगराध्यक्ष सुनिल घरत, भाजपच्या जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, भाजपचे खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कळंबोली मंडल अध्यक्ष अमर पाटील, पनवेल शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंझारराव, नविन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर, कुस्तीगीर संघटनेचे बळीराम पाटील, आयोजक नगरसेवक हॅप्पी सिंग, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, सुप्रसिद्ध कुस्तीपटू आणि प्रशिक्षक रुपेश पावशे, कामोठे महिला मोर्चाच्या अध्यक्षा वनिता पाटील, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव यांच्यासह राज्यातील ज्येष्ठ पैलवान, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी युवानेते परेश ठाकूर यांचा अभिष्टचिंतन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी हजारो मान्यवरांनी आणि नागरिकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी बोलताना आमदार नितेश राणे यांनी आपल्या खास शैलीत राजकीय विरोधकांवर जोरदार निशाणा साधला. कुस्ती स्पर्धेच्या वातावरणाचे कौतुक करताना ते म्हणाले की, माझा आणि कुस्तीचा थेट संबंध दिसेल असे वाटत नाही, कारण आमचा आखाडा वेगळा आहे. आमचा आखाडा हिंदुत्वाचा असून आम्ही रोज 'हिरवे साप' ठेचतो, त्यामुळे या आखाड्यात आणि आमच्या आखाड्यात फरक आहे. पुढे बोलताना राणे म्हणाले की, साधारणपणे एवढी भव्य कुस्ती स्पर्धा फक्त पश्चिम महाराष्ट्रातच पाहायला मिळते असा एक समज आहे. मात्र, आज कामोठ्यात झालेली ही गर्दी आणि आयोजन पाहिल्यानंतर आम्हीही पश्चिम महाराष्ट्रापेक्षा कुठेही कमी नाही, असाच स्पष्ट संदेश परेश ठाकूर यांच्या माध्यमातून गेला आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय एकत्र येणे हे परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाची वाढती ताकद दाखवणारे आहे, असे सांगत परेश ठाकूर यांचे भविष्य उज्वल असल्याचे सांगून वाढदिवसाच्या आणि भावी वाटचालीच्या मनापासून शुभेच्छा दिल्या. या भव्य 'परेश ठाकूर केसरी' कुस्ती स्पर्धेने संपूर्ण पनवेल आणि रायगड जिल्ह्यात एक नवा इतिहास रचला असून, या अभूतपूर्व क्रीडा सोहळ्याची चर्चा आता महाराष्ट्रभर रंगली आहे, असेही त्यांनी अधोरेखित केले.

### ---- मुख्य स्पर्धा----

- ■ रुस्तम-ए-हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध पंजाबचा सुप्रसिद्ध मल्ल पै. लाली चमकोर = पै. सिकंदर शेख विजयी
- ■ उपमहाराष्ट्र केसरी पै. किरण भगत विरुद्ध पै. बागा सिंघ = पै. किरण भगत विजयी
- ■ ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी विरुद्ध हिंद केसरी पै. संदीप कुमार = पै. विजय चौधरी विजयी
- ■ महाराष्ट्र केसरी पै. दादा शेळके विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. माउली कोकाटे = पै. कुस्ती बरोबरीत सुटली
- ■ पै. अमेघा घरत विरुद्ध राष्ट्रीय पदक विजेती पै. एकता शर्मा = पै. एकता शर्मा विजयी
- ■ पै. पलक यादव विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. वेदांतिका पवार = पै. वेदांतीका पवार विजयी
- ■ नेपाळची सुप्रसिद्ध मल्ल पै. रुबी थापा विरुद्ध उत्तराखंडची पै. कोमल = पै. रुबी थापा विजयी

लोकांमध्ये राहून त्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आमदार प्रशांत ठाकूर आणि परेश ठाकूर हे दोन्ही सुपुत्र करत आले आहेत. ते शांत पण धाडसी व्यक्तिमत्व असून लोकांना आधार आणि मदत देण्याचे काम करत असतात. कुस्ती आणि माझे जवळचे नाते आहे. हि स्पर्धा अत्यंत सुरेख असा अनुभवायला मिळाला, अशा शब्दात खासदार श्रीरंग बारणे यांनी शुभेच्छा दिल्या. तर आमदार निरंजन डावखरे यांनी कोकणच्या भूमीत पण कुस्तीवर प्रेम करणारी लोकं आहेत हे या कुस्ती सामन्यातून स्पष्ट होत असल्याचे मत व्यक्त केले.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंनी सहभाग घेतल्याने प्रत्येक सामना अत्यंत चुरशीचा आणि रोमांचकारी ठरला. मुख्य कुस्तीमध्ये रुस्तम-ए-हिंद पै. सिकंदर शेख विरुद्ध पंजाबचा सुप्रसिद्ध मल्ल पै. लाली चमकोर, उपमहाराष्ट्र केसरी पै. किरण भगत विरुद्ध पै. बागा सिंघ, ट्रिपल महाराष्ट्र केसरी पै. विजय चौधरी विरुद्ध हिंद केसरी पै. संदीप कुमार तसेच महाराष्ट्र केसरी पै. दादा शेळके विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. माउली कोकाटे यांच्या लढतींनी प्रेक्षकांचा उत्साह शिगेला पोहोचवला. महिला गटातील सामनेही आकर्षणाचे केंद्र ठरले. पै. अमेघा घरत विरुद्ध राष्ट्रीय पदक विजेती पै. एकता शर्मा, पै. पलक यादव विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. वेदांतिका पवार तसेच नेपाळची सुप्रसिद्ध मल्ल पै. रुबी थापा विरुद्ध उत्तराखंडची पै. कोमल यांच्या लढतींना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला.

या स्पर्धेत जवळपास ७५ सामने खेळविण्यात आले. विजेत्या मल्लांसाठी तब्बल १५ लाख ५५ हजार ५५५ रुपयांची आकर्षक पारितोषिके जाहीर करण्यात आली होती. विशेष म्हणजे स्थानिक आणि ग्रामीण भागातील नवोदित मल्लांनाही या व्यासपीठावर संधी देण्यात आल्याने अनेक तरुण खेळाडूंना मोठी प्रेरणा मिळाली. स्पर्धेसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. भव्य मैदान, प्रशस्त प्रेक्षक गॅलरी, वैद्यकीय सुविधा, हलगीचा ताल, मर्दानी आवाजात सूत्रसंचालन, सुरक्षेची काटेकोर व्यवस्था आणि शिस्तबद्ध नियोजन यामुळे स्पर्धेचे आयोजन सर्वांच्या कौतुकाचा विषय ठरले. परेश ठाकूर यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. युवकांना प्रोत्साहन मिळावे, ग्रामीण भागातील प्रतिभेला व्यासपीठ मिळावे आणि महाराष्ट्राची पारंपरिक कुस्ती संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचावी, या उद्देशाने ते सातत्याने विविध उपक्रम राबवत असतात. कुस्ती हा केवळ खेळ नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि परंपरेचा आत्मा आहे. ग्रामीण भागातील नवोदित मल्लांना संधी आणि प्रोत्साहन मिळावे, यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते, दरवर्षीप्रमाणे यंदाही "मा. श्री. परेशशेठ ठाकूर केसरी" स्पर्धेने क्रीडाप्रेमींच्या मनावर अधिराज्य गाजवले असून, पनवेल तालुक्यातील हा क्रीडा महोत्सव आता प्रतिष्ठेची ओळख बनला आहे.त्यामुळे या ठिकाणी स्पर्धेने मोठी उंची गाठून एकप्रकारे कुस्तीचे महाधिवेशन निर्माण केले होते.

# मनसेत नवचैतन्य; संदेश ठाकूर व योगेश चिले यांच्या फेरनिवडीने कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल दिपक कोळवणकर प्रतिनिधी** : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष Raj Thackeray यांच्या आदेशानुसार रायगड जिल्हाध्यक्षपदी श्री संदेश ठाकूर यांची तर पनवेल महानगरपालिका क्षेत्र अध्यक्षपदी श्री योगेश चिले यांची फेरनिवड करण्यात आली. या निवडीमुळे मनसे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून सर्वत्र आनंद आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

सोमवार दिनांक १८ मे २०२६ रोजी शिवतीर्थ येथे पार पडलेल्या



बैठकीत ही घोषणा करण्यात आली. गेल्या काही वर्षांत संघटन वाढ, जनसामान्यांचे प्रश्न तसेच पक्षाची



भूमिका प्रभावीपणे मांडण्यात संदेश ठाकूर आणि योगेश चिले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

त्यांच्या नेतृत्वावर पक्षश्रेष्ठींनी पुन्हा विश्वास दाखवत ही जबाबदारी सोपवली आहे.या फेरनिवडीमुळे मनसेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळणार असल्याची भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. "तोच उत्साह, तोच जोश आणि जनतेसाठी काम करण्याची तीच तळमळ कायम ठेवत आगामी काळात अधिक ताकदीने काम करू," अशी प्रतिक्रिया पदाधिकाऱ्यांनी दिली.

यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी दोन्ही नेत्यांचे अभिनंदन करत पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# स्मशान टेकडी परिसरात चोरीच्या घटना वाढल्या
# रात्री पोलिस गस्त वाढवण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर,विभाग प्रमुख प्रतिनिधी** : जोगेश्वरी परिसरातील स्मशान टेकडी भागात अलीकडे चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे मुंबई उपनगर सचिव अजित म्हामुणकर यांनी मेघवाडी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांना निवेदन देत रात्रीच्या पोलिस गस्तीत वाढ करण्याची मागणी केली आहे.निवेदनानुसार, उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमुळे अनेक



रहिवासी गावाकडे गेले असल्याने परिसरात घरफोडीच्या घटना वाढल्या आहेत. दिनांक १४ मे २०२६ रोजी रात्री अंदाजे २.०० ते ३.३० वाजण्याच्या दरम्यान परिसरातील सुमारे पाच घरांमध्ये चोरी झाल्याची माहिती देण्यात आली आहे.

सदर घटना श्री चंडिका देवी स्मशान टेकडी परिसर, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे समोर, जोगेश्वरी मेट्रो स्टेशनजवळ घडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने रात्रीच्या वेळी पोलिस गस्त वाढवून आवश्यक ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. मेघवाडी पोलिस ठाण्यात निवेदन स्वीकारण्यात आले असून पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# “चंद्रावर पोहोचलो पण गटारात अजूनही माणूसच उतरतो!”

## पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता व्यवस्थेचा विदारक चेहरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दिपक कोळवणकर प्रतिनिधी**

पनवेल शहर स्वच्छतेत नंबर वन असल्याचे दावे केले जातात... पण ही स्वच्छता नेमकी कोणाच्या जिवावर उभी आहे, हा प्रश्न आज प्रत्येक नागरिकाने विचारण्याची वेळ आली आहे.

एका बाजूला विज्ञानाने एवढी प्रगती केली की माणूस चंद्रावर पोहोचला... पण दुसऱ्या बाजूला गटारातील गाळ काढण्यासाठी आजही गरीब मजुराला स्वतःच्या जीवाची पर्वा न करता गटारात उतरावे लागते, ही अत्यंत लाजिरवाणी आणि संतापजनक बाब आहे.स्वच्छतेच्या नावाखाली या मजुरांना जनावरांसारखे राबवले जाते. ना हातात ग्लोज, ना पायात गमबूट, ना चेहऱ्यावर मास्क... कोणतीही सुरक्षा साधने उपलब्ध नाहीत. गटारातील घाण, दुर्गंधी, विषारी वायू आणि संसर्गजन्य परिस्थितीत हे कामगार अक्षरशः मृत्यूच्या दारात उभे राहून काम करतात.याहूनही गंभीर बाब म्हणजे या कामगारांना योग्य मजुरी देखील मिळत नाही. दिवसभर जीव धोक्यात घालून काम करूनही जोडीमागे फक्त ९०० ते १००० रुपये दिले जातात, तेही पूर्ण मिळतात की नाही याची खात्री नाही. ठेकेदारांकडून त्यांच्या मजबुरीचा उघडपणे फायदा घेतला जात आहे.हे कामगार कोण आहेत, कुठून आणले जातात, त्यांची नोंद आहे का, त्यांच्यावर कोणती वैद्यकीय तपासणी होते का, अपघात झाल्यास जबाबदार कोण — या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाकडे आहेत का?



पनवेल महानगरपालिका आणि संबंधित प्रशासन फक्त कागदावर स्वच्छता मोहिमा दाखवण्यात व्यस्त आहे का?

स्वच्छ शहराचे पुरस्कार घेताना या घाणीत उतरलेल्या माणसांचा विचार का केला जात नाही?

**आज गरज आहे ती फक्त फोटोसेशनची नाही...**

**गरज आहे मानवतेची!**

स्वच्छता कर्मचाऱ्यांना तात्काळ —

- आधुनिक यंत्रसामुग्री
- सुरक्षा साधने (ग्लोज, गमबूट, मास्क, सेफ्टी किट)
- योग्य वेतन
- आरोग्य विमा
- आणि मानवी सन्मान मिळालाच पाहिजे.

नाहीतर “स्वच्छ शहर” हा फक्त दिखावा ठरेल आणि त्या चमकदार घोषणांच्या मागे दडलेली ही अमानवी व्यवस्था समाज कधीच माफ करणार नाही.

# संशोधक विद्यार्थ्यांना मोठा दिलासा

## प्रा. डॉ. प्रशांत विघे यांच्या पाठपुराव्यामुळे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने घेतला सकारात्मक निर्णय

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे संशोधन विद्यार्थ्यांच्या आर.आर.सी. (Research Recognition Committee) आणि आर.ए.सी. प्रक्रियेदरम्यान निर्माण झालेल्या गंभीर प्रशासकीय व कायदेशीर प्रश्नांवर अखेर सकारात्मक तोडगा निघाला असून, नूटा संघटनेचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. प्रशांत विघे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे तब्बल ५६ संशोधक विद्यार्थी आणि तेवढ्याच अधिकृत पीएच.डी. मार्गदर्शकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रशासनाकडून दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ ते ३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या आर.आर.सी. प्रक्रियेदरम्यान, पूर्वीपासून मान्यताप्राप्त संशोधन केंद्रे आणि अधिकृत मार्गदर्शकांना अचानक अपात्र ठरवण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी केला होता. यूजीसी २०२२ च्या निर्देशांच्या आधारावर २९ मे २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या डायरेक्शन क्र. १४१/२०२५ चा वापर करून, आधीपासून संशोधन मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांवर निर्बंध लादण्याचा प्रयत्न होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले होते.



या संदर्भात प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी स्पष्ट भूमिका घेत, कोणताही नवीन नियम किंवा निर्देश पूर्वलक्ष प्रभावाने लागू करता येत नाही, हे कायद्याचे मूलभूत तत्त्व असल्याचे ठामपणे मांडले. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या संशोधक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश प्रक्रिया, कोर्सवर्क, आर.ए.सी. सादरीकरण आणि नोंदणी प्रक्रिया पूर्ण केलेली असताना अचानक त्यांच्या मार्गदर्शकांना अपात्र घोषित करणे ही अन्यायकारक आणि अमानवी भूमिका असल्याची टीका त्यांनी केली होती.

या प्रकरणात आर.आर.सी. प्रक्रियेचे प्रमुख प्र-कुलगुरू प्राचार्य डॉ. महेंद्र ढोरे यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. आधीपासून अधिकृत असलेल्या मार्गदर्शकांना “यापुढे संशोधन मार्गदर्शन करता येणार नाही” असे सांगून प्रक्रिया थांबवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. यामुळे संशोधक विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संभ्रम आणि अस्वस्थता निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर नूटा संघटनेचे सिनेट सदस्य प्रा. डॉ. प्रशांत विघे यांनी कुलगुरूंकडे निवेदन देत संशोधक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, सर्व अधिकृत मार्गदर्शकांना तात्काळ मान्यता द्यावी आणि अकॅडेमिक कौन्सिलच्या चुकीच्या निर्णयात दुरुस्ती करावी, अशी ठाम मागणी केली होती. यावेळी कुलगुरू प्. मिलिंद बाराहाते यांनी विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, याची काळजी घेत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले होते.

दरम्यान, ११ मार्च २०२६ रोजी झालेल्या विद्यापीठाच्या सिनेट बैठकीत जुन्या प्रक्रियेनुसार कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. १/२०१६ च्या नियमांनुसार ज्यांचे प्रवेश झालेले आहेत, त्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्यात येतील, असे स्पष्ट करण्यात आले. त्यानुसार ५६ संशोधक विद्यार्थी आणि संबंधित मार्गदर्शकांची ऑनलाइन आर.आर.सी. प्रक्रिया घेऊन त्यांना संशोधन प्रक्रियेत पुढे जाण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला.

या निर्णयामुळे संशोधक विद्यार्थी, मार्गदर्शक आणि शिक्षक संघटनांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक संशोधक विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी प्रा. डॉ. प्रशांत विघे यांचे अभिनंदन करत, “संशोधक विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी त्यांनी संघर्षपूर्ण आणि अभ्यासपूर्ण भूमिका घेतली. त्यांच्या पुढाकारामुळे आम्हाला मोठा दिलासा मिळाला,” अशा भावना व्यक्त केल्या.

संशोधन क्षेत्रात नियमबाह्य आणि विसंगत निर्णयांविरोधात उभे राहत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी सातत्याने लढा देणारे तरुण नेतृत्व प्रा. डॉ. प्रशांत विघे यांच्या भूमिकेची विद्यापीठ परिसरात व्यापक चर्चा होत आहे. संशोधक विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची शिक्षक, विद्यार्थी आणि शैक्षणिक क्षेत्रातून दखल घेतली जात आहे.

# केळगाव प्रकल्पातून अवैधरीत्या पाणी उपसा!

## अंभई, केळगावसह चार गावांची तहान धोक्यात; प्रशासनाकडे धडक कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील केळगाव (खेळणा ) मध्यम प्रकल्पातून रात्रीच्या सुमारास बेकायदेशीरपणे मोठ्या प्रमाणावर पाणी उपसा होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या अवैध प्रकारामुळे धरणातील जलसाठा वेगाने घटत असून ऐन उन्हाळ्यात अंभई, केळगाव, जांभई आणि रेलगाव या गावांवर तीव्र पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले आहे. या प्रकाराकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रशासनाने तातडीने धडक कारवाई करावी, अशी आग्रही मागणी स्थानिक नागरिकांमधून केली जात आहे.केळगाव येथील हा खेळणा प्रकल्प परिसरातील चारही प्रमुख गावांच्या



पिण्याच्या पाण्याचा मुख्य स्रोत आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून रात्रीच्या वेळेस अवैधरीत्या छुप्या मार्गाने धरणाच्या पात्रात खाजगी पाईपलाईन्स व मोटर्स टाकून पाण्याचा अपहार सुरू असल्याने प्रकल्पाची पातळी कमालीची खालावली आहे. शासन एकीकडे टंचाई निवारणासाठी विविध उपाययोजना करत आहे, मात्र खेळणा प्रकल्पातून रात्रीच्या सुमारास अवैध पाणी उपसा होत आहे. यावर प्रशासन धडक कारवाई का करत नाही? असा संतप्त प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दिवसेंदिवस खेळणा (केळगाव) प्रकल्पातून पाण्याची पातळी खालावत असून, याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास येणाऱ्या काळात तीव्र पाणीटंचाईला सामना करावा लागणार आहे. भविष्यातील या जलसंकटाची दाहकता लक्षात घेता, संबंधित विभागाने या प्रकरणाची तात्काळ गांभीर्याने दखल घ्यावी, धरणावरील अनधिकृत पाईपलाईन्स व यंत्रसामग्रीवर जप्तीची कारवाई करून अवैध पाणी उपसा रोखावा आणि दोषींवर कडक धडक कारवाई करावी, अशी मागणी अंभई, केळगाव, जांभई व रेलगाव परिसरातील ग्रामस्थांनी केली आहे.

# भंडाऱ्यात युवकाची निर्घृण हत्या; परिसरात भीतीचे वातावरण,

## पोलिसांकडून ५ तासांत आरोपीला अटक

**दैनिक युवक आधार**
**के रोशनलाल भंडारा -** भंडारा शहरातील जगनाडे चौक परिसरात रविवारी रात्री उशिरा घडलेल्या हत्येच्या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली आहे. भर रस्त्यावर ३० वर्षीय युवकाची हत्या करण्यात आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मृत युवकाचे नाव रजत विलास लिमजे असे आहे. रविवारी रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. अज्ञात कारणावरून झालेल्या वादातून आरोपींनी रजत लिमजे यांच्यावर हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

गंभीर जखमी अवस्थेत त्याला रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

घटनेची माहिती मिळताच भंडारा पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि परिसराची पाहणी करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलिसांनी तांत्रिक तपास व गुप्त माहितीच्या आधारे अवघ्या पाच तासांत मुख्य आरोपीला ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी भंडारा पोलिसांनी हत्या प्रकरणाचा गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. हत्या नेमकी कोणत्या कारणातून झाली, तसेच या गुन्ह्यात आणखी किती आरोपी सहभागी आहेत, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नाही.

दरम्यान, भर चौकात झालेल्या या थरारक घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# विदर्भ वीरांगना रंजनाताईंच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**अमरावती प्रतिनिधी सौरव डांगरकर** : दिनांक १७ मे २०२६ सकाळी १० वाजता वैदर्भी पंचवटी विदर्भ वीरांगना श्रीमती रंजनाताई मामर्डे म्हणजे निखळ निसर्ग प्रेमी आणि वृक्ष वल्लरींच्या सख्ख्या सोयऱ्या होत्या. त्यांचे पर्यावरणीय क्षेत्रातील प्रेरणादायी कार्य सदैव जिवंत राहावे म्हणून, त्यांनी स्वतः आत्मियतेनी जोपासलेल्या पाच झाडांचे, आज रविवार दिनांक १७ मे २०२६ रोजी पाडवा पहाट परिवार, अमरावती, विदर्भ राज्य आंदोलन समिती आणि सहयोगी संस्थांच्या वतीने, बाबा व्यसनमुक्ती केंद्र, नागपूर रोड अमरावती येथील निसर्गरम्य परिसरात *वैदर्भी पंचवटी* नावाने एक उपवन तयार करून रोपण करण्यात आले.

या प्रसंगी सुप्रसिद्ध मनोचिकीत्सक डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. उषाताई देशमुख, पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, डॉ. पद्मा राजपूत, श्रीकृष्ण चिमोटे, सौ. नीताताई चिमोटे, श्री जैस्वाल, डॉ. संजय गुडधे, पश्चिम विदर्भ मिडिया प्रमुख संकेत चौधरी, प्रा. नीलिमा देशमुख, डॉ. अजय डफळे, विक्रम मामर्डे, भाग्यश्री मामर्डे, श्रीनिवासन, श्रीवल्ली, कार्तिकेय तसेच सहकारी मान्यवर उपस्थित होते.

सकाळी ११.३० वाजता वाशिम जिल्हा श्रद्धांजली सभा विदर्भ राज्य आंदोलन समिती वाशिम जिल्हा शाखेच्या वतीने पश्चिम विदर्भ अध्यक्ष प्राचार्य डॉ पृथ्वीराजसिंह राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली, आदर्श ऑनलाईन महाराष्ट्र न्यूज 24 लाइव्ह, मीरा कॉम्प्लेक्स



सभागृह, कारंजा लाड येथे *स्मृतीशेष विदर्भ वीरांगना श्रीमती रंजनाताई मामर्डे* यांना श्रद्धांजली सभेत विनम्र अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी अमरावती जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष सौ. सुषमा मुळे, कोअर कमिटी मेंबर डॉ. पद्माताई राजपूत, ओमप्रकाश तापडिया, वाशिम जिल्हाध्यक्ष राजू अवताडे, उपाध्यक्ष डॉ. रमेश चंदनशिवे, नितीन पवित्रकार, पश्चिम विदर्भ मिडिया प्रमुख संकेत चौधरी, वाशिम जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष मोनाली गणवीर, संचालक विनोद गणवीर, डॉ. शेजव, वानखेडे तसेच अनेक विदर्भ प्रेमी नागरिक उपस्थीत होते.

**दुपारी ३.०० वाजता**

**सांत्वना भेट**

विदर्भ प्रेमी प्रा. शुभांगी रवाळे यांचे वडील *मधुकरराव बुटले* दिनांक १६ मे २०२६ रोजी त्यांच्या निवासस्थानी मंगरूळ दस्तगीर येथे वृद्धापकाळाने कालवश झाले. शोकाकूल परिवारास विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या वतीने प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत, डॉ. पद्मा राजपूत, सौ. सुषमा मुळे, नितीन पवित्रकार, संकेत चौधरी यांनी सांत्वना भेट दिली.

**सायंकाळी ५.०० वाजता**

**अमरावती जिल्हा श्रद्धांजली सभा**

विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या अमरावती जिल्हा शाखेच्या वतीने स्मृतीशेष विदर्भ वीरांगना श्रीमती रंजनाताई मामर्डे यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यास्तव ताजने सभागृह, अमरावती येथे प्राचार्य डॉ पृथ्वीराजसिंह राजपूत यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रा. रतिलाल सातपुते, प्रा. प्रकाश लढ्ढा, जिल्हाध्यक्ष राजेंद्र आगरकर, जिल्हाध्यक्ष सौ. सुषमा मुळे, शहर अध्यक्ष रियाझ खान डॉ. विजय कुबडे यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रद्धांजली सभा घेण्यात आली.

या प्रसंगी रंजनाताईंचे व्याही श्रीनिवास, जावई कार्तिकेय, मुलगी श्रीवल्ली, मुलगा विक्रम मामर्डे विशेषत्वाने उपस्थित होते. त्याचप्रमाणे यावेळी जिल्हा समन्वयक सतीश प्रेमलवार, प्रा. मोहोड, पांडुरंग बिजवे, अशोक हांडे, अनिल वानखेडे, संकेत चौधरी, नितीन पवित्रकार, चेतन कोरटकर, वृषभ तसेच स्थानिक विदर्भप्रेमी नागरिक उपस्थित होते.

**सायंकाळी ७.००**

**सरकारी नीतीच्या विरोधात धरणे आंदोलन**

विदर्भ राज्य आंदोलन, आम आदमी पार्टी तसेच सहयोगी संस्थांच्या वतीने, देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, नीट पेपर फुट प्रकरण इत्यादी ज्वलंत प्रश्नांना सोडविण्यात अपयशी ठरलेल्या सरकारी नीतीच्या विरोधात धरणे आंदोलन करण्यात आले.यावेळी प्राचार्य डॉ पृथ्वीराजसिंह राजपूत, डॉ पद्मा राजपूत, महेश देशमुख, ठाकूर साहेब, सतीश दुबे तसेच अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# डिझेल-पेट्रोल तुटवड्यामुळे शेतकरी संकटात

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी : विठ्ठल काळे** : परभणी जिल्ह्यात सध्या डिझेल व पेट्रोलचा मोठ्या प्रमाणात तुटवडा निर्माण झाला असून, याचा फटका थेट शेतकरी वर्गाला बसत आहे. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी एका नोटीसद्वारे सर्व पेट्रोल पंप चालकांसाठी नियमावली जारी केली असली, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांना इंधनासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.

सध्या शेतीच्या कामांना वेग आला असून काही दिवसांत पेरणीला सुरुवात होणार आहे. ट्रॅक्टरद्वारे मशागतीवर भर असल्याने डिझेलची मागणी वाढली आहे. मात्र पुरेसा पुरवठा नसल्याने शेतकरी रात्रभर पेट्रोल पंपांवर रांगा लावत असल्याचे चित्र जिल्ह्यात दिसून येत आहे.

उन्हाचा तडाखाही दिवसेंदिवस वाढत असून परभणी जिल्ह्याचे तापमान ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. अशा कडक उन्हातही शेतकऱ्यांना इंधनासाठी ताटकळत राहावे लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

जर ही परिस्थिती अशीच कायम राहिली, तर आगामी पेरणी हंगामावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून शेतीची कामे खोळंबण्याची भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे जिल्ह्यात डिझेल व पेट्रोलचा सुरळीत पुरवठा व्हावा, यासाठी जिल्हा प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# पनवेल महापालिकेच्या आरटीआय उत्तरातून नगरसेवक निधी व्यवस्थेतील धक्कादायक वास्तव उघड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल जगदीश क्षीरसागर प्रतिनिधी** : पनवेल महानगरपालिकेने आरटीआय कार्यकर्ते दिपक कोळवणकर यांना दिलेल्या अधिकृत उत्तरात नगरसेवक निधी (Councilor Fund) वापराबाबत कोणतेही केंद्रीय अथवा महानगरपालिका स्तरावरील एकत्रित रेकॉर्ड उपलब्ध नसल्याची धक्कादायक कबुली दिली आहे. प्रत्येक नगरसेवक स्वतंत्रपणे निधीचा वापर करीत असून, महानगरपालिकेकडे त्याचा संगणकीय किंवा एकत्रित हिशोब उपलब्ध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

आरटीआय अर्ज क्र. PMC/R/2025/50244 दिनांक २९ एप्रिल २०२५ अंतर्गत मागविण्यात आलेल्या माहितीस उत्तर देताना महानगरपालिकेने सांगितले की, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील नगरसेवक निधी संदर्भातील वार्डनिहाय मंजूर रक्कम, खर्च, शिल्लक निधी, कामांची यादी आदी माहिती उपलब्ध नाही. “सदर निधी नगरसेवकांच्या नियंत्रणात आहे,” असे उत्तर देत प्रशासनाने जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप होत आहे.

या उत्तरामुळे करदात्यांच्या पैशातून दिल्या जाणाऱ्या नगरसेवक निधीच्या वापरातील अपारदर्शकता समोर आली आहे. बजेट दस्तऐवजांमध्ये लाखो-कोट्यवधी रुपयांची तरतूद दाखवली जात असताना, प्रत्यक्षात त्या निधीतून कोणती कामे झाली, किती खर्च झाला, कामांची गुणवत्ता काय आहे याबाबत कोणतीही सार्वजनिक माहिती किंवा स्वतंत्र ऑडिट उपलब्ध नसल्याचे उघड झाले आहे.

यामुळे निधीचा दुरुपयोग, भ्रष्टाचार तसेच निकृष्ट दर्जाची कामे होण्याची शक्यता वाढल्याची चिंता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.आरटीआय कार्यकर्ते दीपक कोलवणकर म्हणाले, “जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींना विकासकामांसाठी निधी दिला जातो. मात्र तो निधी नेमका कुठे, कसा आणि कोणत्या कामांसाठी खर्च झाला याचे उत्तर महानगरपालिका देऊ शकत नाही, ही लोकशाही आणि पारदर्शकतेसाठी अत्यंत गंभीर बाब आहे.”

यासंदर्भात त्यांनी काही महत्त्वाच्या मागण्या देखील केल्या आहेत. त्यामध्ये नगरसेवक निधीच्या प्रत्येक कामाचा वार्डनिहाय व कामनिहाय सार्वजनिक डॅशबोर्ड तयार करणे, निधी वापराचे वार्षिक ऑडिट करून जीपीएस फोटोसह अहवाल प्रसिद्ध करणे, भूतकाळातील खर्चाची संपूर्ण यादी जाहीर करणे तसेच निधी विनियोगासाठी स्पष्ट नियमावली आणि जबाबदारी निश्चित करणे यांचा समावेश आहे.पनवेलकर करदात्यांना त्यांच्या पैशाचा पारदर्शक हिशोब मिळणे हा त्यांचा अधिकार असून, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष देऊन पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## फर्दापूर पाणीपुरवठा समस्येची आ. अब्दुल सत्तार यांनी घेतली तातडीने दखल

### फर्दापूर ग्रामस्थांचे आ. अब्दुल सत्तार यांना आभार



**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील फर्दापूर येथील पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेमध्ये वारंवार बिघाड होऊन पाईपलाईन फुटणे,गळती होणे तसेच पाणीपुरवठा खंडित होण्याच्या समस्या निर्माण होत होत्या.यामुळे ग्रामस्थांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत होता. या संदर्भात फर्दापूर येथील ग्रामस्थांनी आमदार अब्दुल सत्तार यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे सदरील समस्येबाबत तक्रार केली होती.ग्रामस्थांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित यंत्रणेला तातडीने चौकशी समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले होते.त्यानुसार आज तलाठी, ग्रामसेवक तसेच पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचे पथक फर्दापूर गावात दाखल झाले. या पथकाकडून पाणीपुरवठा व्यवस्थेची पाहणी करण्यात येत आहे. यावेळी पाईपलाईनमधील तांत्रिक बिघाड,गळती व वारंवार खंडित होणाऱ्या पाणीपुरवठ्याबाबतच्या तक्रारींचे तातडीने निराकरण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच नागरिकांना सुरळीत व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाकडून आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.दरम्यान, आमदार अब्दुल सत्तार यांनी ग्रामस्थांच्या तक्रारीची तातडीने दखल घेऊन संबंधित यंत्रणेमार्फत कार्यवाही सुरू केल्याबद्दल फर्दापूर येथील ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# सिल्लोड तालुक्यात अवैध वृक्षतोडीचा धुमाकूळ!

### वन व महसूल विभागाचे 'रान मोकळे'; तस्करांच्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे शेतकरी हतबल

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यात मागील काही दिवसांपासून अवैध वृक्षतोड मोठ्या प्रमाणावर सुरू असून, संबंधित शासकीय अधिकारी ठोस कारवाई करीत नसल्याने लाकूड तस्करांना रान मोकळे झाले आहे. दुसरीकडे, वेगवेगळ्या विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेले प्राधिकरणाचे याकडे दुर्लक्ष असल्याचे दिसून येत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

तालुक्यातील पिंपळदरी, भराडी, जांभई, अंभई, बोरगाव, घाटनांद्रा, केळगाव, आमठाणा, चारनेर, वांगी आणि मोढा आदी गावांच्या परिसरातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणात अवैध वृक्षतोड सुरू आहे. या वृक्षतोडीत विविध जातीची



अनेक झाडे कापली जात आहेत. विशेषतः कडूनिंब आणि आडजातीच्या झाडांची मोठ्या प्रमाणात कटाई होत असून, हा कटाई केलेला माल मालवाहू गाड्यांनी बिनधास्तपणे शहरातील काही आरामशीनवर नेला जात आहे. महसूल, वन विभाग व पोलीस खात्याचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. कारवाई होत नसल्याने वृक्ष कटाई करणाऱ्यांचे फावत असून, त्यांना कोणाचाही धाक उरलेला दिसत नाही, अशी चर्चा नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. या वृक्ष कटाईच्या व्यवसायात शहरातील अनेक जण सहभागी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

**दिवसा नियोजन, मध्यरात्री कटाई!**

हे लाकूडतोडे सकाळपासून जंगलातील व परिसरातील झाडे शोधून त्याचे कापण्याचे नियोजन करीत असतात. या लाकूड तस्करांचे संबंध वन विभाग व महसूल विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांसोबत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे. त्यामुळेच संपूर्ण तालुक्यातील वृक्षकटाईचा माल दिवसाढवळ्या वाहून नेला जात आहे. एकंदरीत या प्रकारामुळे महसूल व वन विभागाच्या कर्तव्यदक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

***शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण**

अवैध वृक्षतोड करणारे काहीजण गुन्हेगारी प्रवृत्तीचे असून अनेक वेळा त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले आहेत. शेतातील झाड तोडत असताना अनेक वेळा शेतकरी या गुन्हेगारी वृत्तीच्या लोकांना पाहून सुरक्षेच्या कारणास्तव शेतातून पळून जातात. त्यामुळे त्यांचे मनसुबे अधिकच वाढत चालले आहेत. हे लोक मध्यरात्री झाडांची कटाई करत असून सूर्योदय होण्यापूर्वी त्या वृक्षांसह शहरात दाखल होतात, अशी माहिती आहे.

यासंदर्भात वन विभाग व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते उपलब्ध होऊ शकले नाहीत.

**आरामशीनवर कसून चौकशी आवश्यक!**

**वन विभाग तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहर आणि ग्रामीण भागातील आरामशीनवर येणाऱ्या लाकडांची चौकशी व तपासणी मोहीम सुरू करण्याची मागणी पुढे आली आहे. एवढेच नव्हे तर, तालुक्यात सर्रास सुरू असलेल्या या अवैध वृक्षकटाईबाबत वन व महसूल विभागाने आतापर्यंत नेमक्या किती कारवाया केल्यात, याबाबतही वरिष्ठ पातळीवरून कायदेशीर तपासणी केली जाणे आवश्यक आहे.**

## सिल्लोड तालुक्यात मान्सूनपूर्व पशु लसीकरण मोहीम सुरू
## ३० हजार जनावरांना डोस; उर्वरित पशुपालकांना लसीकरणाचे आवाहन



**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड:-पाळीव प्राण्यांना मान्सून पुर्व लसीकरण करणे सुरू झाले असून सोमवार पर्यंत ३० हजार पाळीव जनावरांना लसीकरण करण्यात आले असून उर्वरित शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांना लसीकरण करून घ्यावे असे आवाहन पंचायत समितीच्या पशु संवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे. दरवर्षी जिल्हा परिषदेच्या वतीने पंचायत समितीच्या पशू संवर्धन विभागाकडून मान्सून पूर्व लसीकरण मोहीम राबविण्यात येते. यासाठी घटसर्प, फऱ्या व आत्रविषार रोग प्रतिबंधक लसीकरण केल्या जाते. सिल्लोड तालुक्यात १ लाख १८ हजार ६९९ पशुधन आहे. या पैकी सोमवार (दि.१८) पर्यंत २५ टक्के म्हणजे ३० हजार पाळीव प्राण्यांना लसीकरण करण्यात आले आहे. यासाठी तालुक्यातील जिल्हापरिषद अंतर्गत असलेले ११ व राज्य शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या ८ अशा १९ पशु वैद्यकीय दवाखान्यातून ४० कर्मचाऱ्यांच्या सहकार्यांनी ही लसीकरण मोहीम राबविणे सुरू आहे.

मागील पाच वर्षात मोठ्या प्रमाणात लम्पी रोगाने सर्वत्र थैमान घातले होते. या दरम्यान तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे पशुधनाचे नुकसान झाले. आपल्या जनावरांना वरील प्रकारचे आजार होऊ नये यासाठी शासनाच्या वतीने पूर्णतः मोफत रोगप्रतिबंधक लसीकरण सुरू आहे.

यासाठी उर्वरित शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांना सदरील लसीकरण करून घ्यावे व आपली जनावरे सुरक्षित करून घ्यावी असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय उपायुक्त डॉ. एम एस कदम यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय अधिकारी डॉ. विजय चव्हाण यांनी केले आहे.

**तालुक्याची पशुधन सांख्यिकी पुढीलप्रमाणे:**

तालुक्यात गाय वर्गीय- ५०१६०, म्हैस वर्गीय- ११६२४, शेळ्या- ४३०४६, मेंढ्या- १२१५०, वराह- १००२, कुत्रे- ८८६ आणि घोडे- ३१ असे एकूण १,१८,६९९ पाळीव पशुधन आहे.

**मंजूर पदांच्या तुलनेत केवळ ५० टक्के कर्मचारी कार्यरत**

**जिल्हा परिषद अंतर्गत सिल्लोड पंचायत समितीच्या तालुका पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय या कार्यालयासाठी ४० कर्मचारी संख्या मंजुर असून सध्या या कार्यालयाकडे केवळ २० कर्मचारी असल्याने लसीकरण मोहिमेचे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. लसीकरण मोहीम वेळेच्या आत पूर्ण होण्यासाठी या कार्यालयास पुरेसे कर्मचारी आवश्यक आहेत.**

## राज्यातील मातंग समाजाची सरकारकडे शेवटची मागणी




**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे** : सकल मातंग समाज आणि अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण कृती समिती यांच्या वतीने मुंबई प्रेस क्लब येथे राज्यस्तरीय बैठक व पत्रकार परिषद घेत शेवटची इशारा मागणी मातंग समाजाचे नेते बाबुराव मुखेडकर यांनी दिला.

यावेळी रमेश बागवे, दिलीप कांबळे, लक्ष्मण ढोबळे, उत्तम खंदारे, आमदार सुनील कांबळे, अमित गोरखे,जितेश अंतापूरकर,नरेंद्र भों डेकर तसेच माजी आमदार व मारुती वाडेकर, सुदाम धुपे उपस्थित होते.बैठकीत वक्त्यांनी अनुसूचित जातींमधील विविध घटकांना न्याय मिळण्यासाठी आरक्षणाचे उपवर्गीकरण आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. अनेक वर्षांपासून काही समाज घटक विकासापासून वंचित राहिल्याचा आरोप करत सरकारने याबाबत तातडीने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

पत्रकार परिषदेत राज्यभरातील मातंग समाज संघटनांना एकत्र आणून व्यापक जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला. समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीसाठी स्वतंत्र धोरण आखण्याची आवश्यकता वक्त्यांनी अधोरेखित केली.

## लाखनीला लाभलेला शैक्षणिक धुरंधर

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : खूप कमी व्यक्ती आढळतात समाजामध्ये जे त्यांच्या लहानपणापासून ते मोठेपणापर्यंतच्या प्रत्येक घडामोडीतून शिकतात आणि समाजामध्ये आवश्यक तो बदल घडवून आणायचा प्रयत्न करतात. अशाच एका लाखनीच्या धुरंदराची कहाणी, म्हणजे आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग चे संचालक श्री निहाल जी वालदे सर यांची. लहानपणीचे शिक्षण लाखनी मध्ये झाल्यानंतर बाहेर उच्च शिक्षणासाठी म्हणजेच इंजीनियरिंगच्या शिक्षणासाठी जाऊन तिथे सुवर्णपदकाचे मानकरी ठरवून लाखनी तालुक्याचा नाव उजागर केल्यानंतर, भरपूर कौशल्यामध्ये जसे वैयक्तिक समुपदेशन, व्यक्तिमत्व विकास, शैक्षणिक प्रशिक्षक, इंग्लिश स्पिकिंग ट्रेनर, इत्यादीमध्ये पारंगत झाल्यानंतर भरपूर सरकारी नोकऱ्या फेटाळून समाजाविषयी बांधिलकी आणि समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक दृष्ट्या एक उंच पातळीवर नेण्याचा ध्यास आणि निश्चय बाळगून ते लाखनीमध्ये परतले. लगेच कोरोना काळ आल्यामुळे त्यांचे हे ध्येय काही वर्ष पुढे ओलांडलं. पण निहाल सर थांबले नाही ते ऑनलाईन माध्यमातून वैयक्तिक समुपदेशन करायचे इंग्लिश स्पिकिंग ट्रेनिंग द्यायचे आणि सोबतच वेगवेगळ्या




शैक्षणिक प्रशिक्षणे सुद्धा द्यायचे. वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन ते सेमिनार घ्यायचे. कोरोना काळ संपल्यानंतर लगेच त्यांनी एक असा पाऊल उचलला ज्यामुळे विद्यार्थ्यांसाठी जनु एक सुवर्णसंधी निर्माण झाली ती म्हणजे त्यांचा सर्वांगीण विकास म्हणजेच एकंदरीत बघायला गेलं तर संपूर्ण सामान्य विद्यार्थ्यांना घडवण्याचा एक मात्र प्लॅटफॉर्म तो म्हणजे आर्टस ऑफ लाइफ कोचिंग ट्रेनिंग एज्युकेशन नाव्या रूपाने आलेली शैक्षणिक कोचिंग क्लासेस. या शैक्षणिक कोचिंग क्लासेस मध्ये फक्त विषयांवरच नाही तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पण भर दिला जाते. श्री निहाल वालदे सर यांच म्हणणं असं आहे की विद्यार्थ्यांना जर घडवायचं असेल तर या कोचिंग चा भाग बनाव अन्यथा इतरत्र कुठेही शिकवावं. आज आम्ही सर्वांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार केला तर अशाच कुठल्यातरी शैक्षणिक संस्थेची गरज आहे. लाखनी तालुक्यामध्ये भरपूर गोरगरीब विद्यार्थी आहेत म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करून निहाल वालदे सरांनी या कोचिंग क्लासेसचा पाया रचला. या कोचिंगला चार वर्षे पूर्ण झालेली आहेत. तळागाळातील ज्या विद्यार्थ्यांना काही शैक्षणिक क्षेत्रातल येत नाही अशा विद्यार्थ्यांना मोलाच ज्ञान देऊन त्यांना उच्च स्तर देण्याचं आणि त्यांना त्यांच्या शाळेमध्ये प्रथम क्रमांक पटकवण्या इतक योग्य बनवण्याचा प्रयत्न सातत्याने आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग करत आहे. लाखनी तालुक्यातील प्रत्येक पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी निश्चितच या कोचिंग चा लाभ घेतला पाहिजे आणि श्री.निहाल वालोदे सरांच्या दूरदृष्टीच्या या निश्चयाला नक्की साथ दिली पाहिजे. दरवर्षी समर ट्रेनिंग किंवा समर कॅम्प या नावाने निहाल सर प्रत्येक विद्यार्थ्याला भविष्यामध्ये अति आवश्यक असणारे प्रशिक्षण वेगवेगळ्या प्रशिक्षकांमार्फत देण्याचा प्रयत्न करतात. त्या समर ट्रेनिंग च नाव म्हणजे भविष्य समोर ट्रेनिंग 2.0. या ट्रेनिंग मध्ये नेहमी निहाल सर स्वतःची ट्रेनिंग म्हणजेच इंग्लिश स्पिकिंग ची ट्रेनिंग मोफत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देतात. ज्यांना असं वाटते की आपल्याला सुद्धा इंग्रजी बोलता आली पाहिजे त्यांनी नक्कीच निहाल वालदे सरांकडून मार्गदर्शन घ्यावे. पिढ्या ओलांडून जातात पण समाजामध्ये खूप कमी लोक असे असतात जे समाजाचा विचार करून उभे होतात ताठ मानेने सर्व गोष्टी करायचा प्रयत्न करतात आणि समाजाने सुद्धा अशा व्यक्तींना जर साथ दिली तर नक्कीच हे धुरंदर व्यक्ती समाजाला नक्कीच योग्य ठरतात. श्री निहाल वालदे सरांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

## मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव : (यवतमाळ )** : मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा शैक्षणिक सत्र 2025-26 इयत्ता दहावी व बारावी च्या महागाव तालुक्यातील सर्व शाळांच्या प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन मातोश्री विद्यालय महागाव येथे दिनांक 20 मे बुधवारला सकाळी 10 वाजता करण्यात आले आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांच्या दैदीप्यमान यशाबद्दल त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकण्यासाठी त्यांचा गुण गौरव करण्यासाठी अभिनंदन करण्यासाठी गौरवपत्र देऊन यथोचित सन्मान माननीय श्री दत्तात्रय कदम साहेब गटविकास अधिकारी पंचायत समिती महागाव यांच्या शुभहस्ते, माननीय श्री संजय कांबळे गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती महागाव यांचे अध्यक्षतेखाली व श्री यशवंत देशमुख सर राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक यांच्या विद्यार्थ्यांच्या अनमोल मार्गदर्शनाखाली कार्यक्रम संपन्न होणार आहे. या गुणगौरव सोहळयासाठी सर्व गुणवंत विद्यार्थी व पालकांनी उपस्थित रहावे असे आवाहन मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीकांत देशमुख, जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे, जिल्हा सहसचिव अमोल जगताप, तालुका अध्यक्ष उदय भाऊ नरवाडे, तालुका सचिव पंकज देशमुख, तालुका कार्याध्यक्ष सतीश ठाकरे,तालुका उपाध्यक्ष विठ्ठल वाघमारे व सर्व मराठा सेवा संघ तालुका कार्यकारणी च्या वतीने करण्यात येत आहे.

## मादळमोही परिसरातील वन्यजीव तहानलेले; पाणवठ्यांच्या अभावामुळे वन्य पशु-पक्ष्यांची भटकंती वाढली

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी** : मादळमोही व परिसरातील वनक्षेत्रामध्ये सध्या तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून वन्य पशु-पक्ष्यांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी भटकंती करावी लागत आहे. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना वनविभागाकडून नैसर्गिक पाणवठे, कृत्रिम टाक्या अथवा पाण्याची नियमित व्यवस्था होत नसल्याचे चित्र दिसून येत आहे.



परिसरातील जंगल भागात हरीण, रानडुक्कर, ससे, मोर तसेच विविध पक्षी प्रजाती वास्तव्य करतात. मात्र पाण्याअभावी हे वन्यजीव आता गावांच्या दिशेने येऊ लागल्याने त्यांचे जीव धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी लहान पाणवठे पूर्णपणे कोरडे पडले असून वन्यजीवांना तहानेने व्याकूळ अवस्थेत फिरावे लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

स्थानिक नागरिक व पर्यावरणप्रेमींनी वनविभागाने तात्काळ लक्ष देऊन जंगल परिसरात पाण्याच्या टाक्या, सिमेंट कुंड्या व टँकरद्वारे पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. तसेच उन्हाळा संपेपर्यंत नियमित पाणीपुरवठा करून वन्यजीवांचे संरक्षण करावे, अशी अपेक्षाही व्यक्त होत आहे.

वन्य पशु-पक्ष्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत परिसरातून व्यक्त होत आहे.

# अलिबाग-रेवदंडा रस्त्यावर पाणी मारण्यासाठी ज्वलनशील मालमत्तेसाठी नोंदणीकृत टँकरचा बेकायदेशीर वापर

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा** : अलिबाग-रेवदंडा मार्गावर चालू असलेल्या रस्त्याच्या कामासाठी काम करणाऱ्या कंत्राटदारावर गंभीर सुरक्षा उल्लंघनाचे आरोप करण्यात आले आहेत. आरपीपी इन्फ्रा प्रोजेक्टस् या कंत्राटदार कंपनीवर, हिंदुस्थान पेट्रोलियमच्या नावावर नोंदणीकृत आणि ज्वलनशील द्रव वाहतुकीसाठी नोंदणीकृत टँकर क्रमांक एमएच-२१-एक्स-९८३३ चा पाणी मारण्यासाठी बेकायदेशीर वापर केल्याचा धक्कादायक आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका सचिव (मुरुड पद्मदुर्ग) राजेश गजानन तरे यांनी संबंधित विभागांना दिलेल्या तक्रारीत केला आहे.

तक्रारीनुसार, हा टँकर मूळतः पेट्रोल, डिझेल किंवा इतर धोकादायक रसायन वाहतुकीसाठी नोंदणीकृत असून त्यात अशा रसायनांचे अवशेष असण्याची स्पष्ट शक्यता आहे. अशा प्रकारच्या टँकरचा पाणी साठवण्याकरिता किंवा पाणी मारण्यासाठी वापर करणे अत्यंत धोकादायक आहे, ज्यामुळे आग लागणे, स्फोट होणे किंवा विषारी वायूंचा प्रसार होण्याचा धोका उभा राहतो. तरे यांनी सांगितले की, या निष्काळजी वर्तनामुळे चौल परिसरातील रहिवाशांची जीविते, सार्वजनिक सुरक्षितता आणि पर्यावरण यांना गंभीर हानी पोहोचू शकते.

कायदेशीर मागण्या आणि संबंधित विभागांना पत्रव्यवहार

तक्रारीत, तरे यांनी टँकर मालक, चालक आणि कंत्राटदारांविरुद्ध भारतीय दंड संहितेची कलमे २६८ (जीवाणूजन्य किंवा सूक्ष्मद्रव्ये इत्यादीच्या प्रसाराशी संबंधित), २७८, २८४ तसेच ३३६, ३३७ आणि ३३८ (लोकांच्या जीवनाला धोका निर्माण करणाऱ्या कृत्यांशी संबंधित) अंतर्गत गुन्हे नोंदविण्याची मागणी केली आहे. तसेच मोटार वाहन कायदा, १९८८ आणि पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गतही आवश्यक ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.




तक्रारदाराने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांना पत्राद्वारे याबाबत सूचित केले आहे. त्यांनी घटनास्थळी तांत्रिक आणि कायदेशीर चौकशी करून तातडीने टँकरची रासायनिक चाचणी करण्याची आणि निष्कर्षानुसार पुढील कारवाई करण्याची मागणी ठेवली आहे.

**स्थानीय प्रतिक्रिया आणि पुढील मागण्या**

घटनेची माहिती समजल्यावर स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, नागरिक आणि मनसेचे प्रतिनिधी घटना स्थळी दाखल झाले. स्थानिकांनी कंत्राटदारावर कडक कारवाई, कंत्राट रद्द करणे आणि कंपनीला काळ्या यादीत घालण्याची मागणी केली आहे. तसेच, रस्त्याच्या कामात गुन्हेगार व निष्काळजी पद्धती वापरणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्यांवर तत्काळ कार्यवाहीची मागणी करण्यात आली आहे.

सुरक्षितता कायद्यानुसार संभाव्य परिणाम

## मनसे तालुका सचिव राजेश तरे यांची तातडीने कारवाईची मागणी

विशेषज्ञांच्या मते, पेट्रोलियम-नोंदणीकृत टँकरचा पाणी मारण्यासाठी वापर करणे नुसतेच कायदेशीर उल्लंघन नाही तर सार्वजनिक आरोग्यासाठी आणि पर्यावरणासाठी मोठा धोका ठरू शकतो. अशा टँकरमध्ये शिल्लक रसायनांच्या कारणामुळे आग लागण्याची किंवा झाडांवर, जमीन आणि पाण्याच्या स्रोतांवर रसायनांचा परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे घटनास्थळी तातडीने रासायनिक चाचणी आणि प्रकरणाची सखोल चौकशी करणे अत्यावश्यक आहे.

शासकीय प्रतिसादाची अपेक्षा

तक्रार मिळाल्यानंतर संबंधित विभागांनी तातडीने कारवाई न केल्यास स्थानिकांनी उच्च अधिकाऱ्यांना, मानवाधिकार संघटना किंवा माध्यमांमार्फत ही बाब उजागर करण्याचा इशारा दिला आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अशा प्रकारचा गैरव्यवहार परवाना देणाऱ्या किंवा दुर्लक्ष करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यांवरही चौकशी होणे आवश्यक आहे.

मागील प्रकरणे आणि पॅटर्न

राज्यात वेळोवेळी रस्त्यांच्या कामात आणि विविध सार्वजनिक कामांमध्ये सुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळून आले आहे. तातडीने कठोर नियमावली आणि तंत्रसिद्ध तपासणी न करता कामे देण्यामुळे अशा प्रकारचे धोके वाढतात, असे स्थानिकांनी आणि सुरक्षा तज्ञांनी अधोरेखित केले आहे

# मोबाईलच्या स्क्रीनवरून समाजक्रांती!

## परसोडी-सौदळचा मनोज भोंडे ठरतोय ग्रामीण भागातील तरुणांचा 'डिजिटल हिरो'

**दैनिक युवक आधार**

**भंडारा प्रतिनिधी स्वप्नील काटवले** : एका हातात मोबाईल, समोर कॅमेरा आणि मनात समाज बदलण्याची जिद्द... परसोडी-सौदळ येथील युवा सामाजिक कार्यकर्ता मनोज भोंडे आज सोशल मीडियाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांचा आवाज बनत आहे. गावखेड्यातील समस्या, समाजातील अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश आपल्या प्रभावी व्हिडिओ व रील्सच्या माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवत तो युवकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे.

आज अनेक तरुण सोशल मीडियाचा वापर केवळ मनोरंजनासाठी करत असताना, मनोज भोंडे यांनी त्याच सोशल मीडियाला समाजजागृतीचे प्रभावी हत्यार बनवले आहे. त्यांच्या प्रत्येक व्हिडिओमध्ये वास्तवाची झळ, समाजासाठीची तळमळ आणि बदल घडवण्याची प्रामाणिक धडपड दिसून



येते. त्यामुळेच त्यांच्या व्हिडिओंना ग्रामीण भागात मोठा प्रतिसाद मिळत असून युवक त्यांना प्रेरणास्थान मानू लागले आहेत.

फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲप सारख्या माध्यमांवरून ते सातत्याने जनतेचे प्रश्न मांडतात. रस्ते, पाणी, शिक्षण, बेरोजगारी, व्यसनमुक्ती यांसारख्या गंभीर विषयांवर ते निर्भीडपणे आवाज उठवत आहेत. विशेष म्हणजे फक्त समस्या दाखवून थांबत नाहीत, तर प्रशासनाचे लक्ष वेधून त्यावर उपाययोजना व्हाव्यात यासाठीही ते प्रयत्नशील असतात.

ग्रामीण भागातील अनेक युवक त्यांच्या कामामुळे प्रेरित होत असून "मोबाईल फक्त मनोरंजनासाठी नाही, तर समाज परिवर्तनासाठीही वापरता येतो," हा संदेश मनोज भोंडे यांनी आपल्या कार्यातून दिला आहे. त्यांच्या व्हिडिओंमध्ये गावातील वास्तव, लोकांच्या भावना आणि बदलाची हाक स्पष्ट दिसून येते."सोशल मीडिया हे दुधारी शस्त्र आहे;त्याचा विधायक वापर केला तर समाजात मोठी क्रांती घडू शकते,"असे मत मनोज भोंडे यांनी व्यक्त केले.आज परसोडी-सौदळ परिसरातच नव्हे तर संपूर्ण भागात "मनोज भोंडे" हे नाव डिजिटल समाजजागृतीच्या नव्या चेहऱ्याप्रमाणे पुढे येत असून, समाजहितासाठी सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करणारा हा तरुण अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# बजरंगनगरातील नाली बांधकामाचा प्रश्न ऐरणीवर

**सहा महिन्यांपासून आश्वासनांची खैरात नगरपरिषदेच्या निष्क्रियतेविरोधात नागरिकांमध्ये संताप**

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर** : दिग्रस शहरातील बजरंगनगर परिसरातील नाली बांधकामाचा प्रश्न गेल्या सहा महिन्यांपासून प्रलंबित असून नागरिकांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वारंवार नगरपरिषदेला निवेदने, पत्रव्यवहार तसेच आंदोलन करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते गजानन गंडाळे तथा स्थानिक नागरिकांनी केला आहे.

परिसरातील नालीचे खोदकाम करण्यात आले, मात्र त्यानंतर बांधकाम पूर्णपणे रखडले आहे. अर्धवट अवस्थेत पडून असलेल्या नालीमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असून पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये



भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. खोदकाम केलेल्या जागेमुळे अपघाताचा धोका वाढला असून लहान मुले व वृद्ध नागरिकांना विशेष त्रास सहन करावा लागत आहे.अनेक वेळा नगरपरिषद प्रशासनाला लेखी तक्रारी दिल्या, तसेच आंदोलनाचा मार्गही अवलंबला. मात्र, प्रत्येक वेळी केवळ आश्वासन देऊन वेळ मारून नेण्यात आल्याचा आरोप गजानन गंडाळे व स्थानिक नागरिकांनी केला आहे. दिग्रस चे नगराध्यक्ष पंचशीला इंगोले यांनी काम तातडीने सुरू करण्याचे आश्वासन दिले होते, परंतु प्रत्यक्षात कोणतीही हालचाल दिसून आली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

"नगरपरिषदेच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांचे हाल होत आहेत. सहा महिने उलटूनही साधे बांधकाम सुरू झाले नाही. प्रशासनाने जनतेच्या समस्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले असून आश्वासनांची केवळ केराची टोपली दाखवली जात आहे," अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली. नालीचे काम तात्काळ पूर्ण न झाल्यास परिसरात पाणी साचणे, दुर्गंधी व साथीच्या आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे प्रशासनाने त्वरित दखल घेऊन काम सुरू करावे, "नागरिकांच्या कराच्या पैशातून चालणारी नगरपरिषद जनतेच्या मूलभूत सुविधांकडेच दुर्लक्ष करत असेल तर हे प्रशासन जनतेसाठी आहे की फक्त कागदोपत्री?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

बजरंगनगरातील नागरिकांनी आता तीव्र आंदोलनाचा इशारा दिला असून, तात्काळ नाली बांधकाम सुरू न झाल्यास नगरपरिषद कार्यालयासमोर मोठे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. "आता आश्वासन नको, काम पाहिजे," अशी ठाम भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

# जनगणना २०२७ यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे

**तहसीलदार पनवेल यांचे आवाहन**

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : भारत सरकारमार्फत देशभरात सन २०२७ ची जनगणना प्रक्रिया राबविण्यात येणार असून ही प्रक्रिया देशाच्या विकास आराखड्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जनगणनेद्वारे लोकसंख्या, शिक्षण, निवास, रोजगार, सामाजिक व आर्थिक परिस्थिती यासंबंधी अचूक माहिती संकलित केली जाते. या माहितीच्या आधारे शासन विविध विकासात्मक योजना व धोरणे आखत असते. तहसीलदार पनवेल, मीनल भोसले यांनी पनवेल तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, जनगणना अधिकारी व कर्मचारी आपल्या परिसरात दिनांक १६ मे पासून भेट देतील त्यावेळी त्यांना योग्य, अचूक व संपूर्ण माहिती द्यावी तसेच प्रशासनास पूर्ण सहकार्य करावे.जनगणना ही केवळ शासकीय प्रक्रिया नसून देशाच्या प्रगतीसाठी प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. त्यामुळे कोणतीही चुकीची माहिती न देता सत्य माहिती उपलब्ध करून द्यावी. जनगणने दरम्यान गोळा करण्यात येणारी माहिती ही पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असून तिचा वापर केवळ शासकीय व सांख्यिकी उद्देशासाठीच केला जाईल. तसेच नागरिकांनी जनगणना कर्मचाऱ्यांना सहकार्य करून जनजागृती करण्यातही सहभाग घ्यावा, असे आवाहन प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# "जोगेश्वरीतील विकासकामावरून वाद तीव्र; स्थानिक नागरिकांना नोटीस, परिसरात चर्चा"

**दैनिक युवक आधार**

**मुंबई किशोर गुडेकर -विभाग प्रतिनिधी प्रमुख** : जोगेश्वरी (पूर्व) येथील जोगेश्वरी गुंफा महानगरपालिका शाळेसमोरील सुरू असलेल्या विकासकामावरून परिसरातील वाद अधिक तीव्र होताना दिसत आहे. यापूर्वी या प्रकरणी रस्ता बंद झाल्यामुळे विद्यार्थ्यांना, पालकांना आणि नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबाबत बातमी प्रसिद्ध झाली होती. त्यानंतर स्थानिक आमदारांनीही परिसराची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत आवश्यक सूचना दिल्या होत्या.

मात्र, स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, विकासकाम अद्याप




सुरू असून परिसरातील अडचणी कायम आहेत. खोदकाम, बांधकाम साहित्य आणि पर्यायी मार्गामुळे नागरिकांना दैनंदिन हालअपेष्टा सहन कराव्या लागत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, या प्रकरणात परिसरातील काही स्थानिक नागरिक व मंदिराशी संबंधित युवकांना नोटीस पाठवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे परिसरात विविध चर्चांना उधाण आले आहे. काही स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, नागरिकांच्या प्रश्नांवर आवाज उठवणाऱ्यांवर दबाव टाकला जात असल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे. तर दुसरीकडे संबंधितांकडून काही आरोप करण्यात आल्याची चर्चा देखील सुरू आहे.

मात्र, या सर्व प्रकरणात अधिकृतरीत्या कोणतीही अंतिम भूमिका समोर आलेली नसून, सत्य परिस्थिती प्रशासनाच्या चौकशीनंतर स्पष्ट होणार असल्याचे बोलले जात आहे.

त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाने निष्पक्ष चौकशी करून परिसरातील तणाव कमी करावा आणि सर्व संबंधित पक्षांची बाजू ऐकून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी केली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, विकासकाम आवश्यक असले तरी विद्यार्थ्यांची सुरक्षा, नागरिकांची सोय आणि सामाजिक सलोखा अबाधित राहणे तितकेच महत्त्वाचे आहे.

# "राजा शिवाजी" चित्रपटाने रचला इतिहास!!

## १८ दिवसांत १०० कोटी पार! सैराट चित्रपटाच्या रेकॉर्ड ला टाकले मागे

**दैनिक युवक आधार**

**ता कर्जत / वैभव गायकवाड** : १ मे २०२६ रोजी प्रदर्शित झालेला जिनीलिया देशमुख आणि रितेश देशमुख कृत "राजा शिवाजी" चित्रपटाने बॉक्स ऑफिस वर अगदी धुमाकूळ गाजवला आहे. आजवर या चित्रपटाने १०० कोटींच्या वर कमाई केली आहे.

रितेश देशमुख मुख्य भूमिकेत म्हणजे छत्रपती शिवाजी राजांची भूमिका साकारताना दिसत आहे. हा चित्रपट मराठी तसेच हिंदी भाषेत प्रदर्शित झाला असून लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद या




चित्रपटासाठी दिसत आहे. उन्हाळ्याच्या सुट्ट्या असल्याने आणि महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित असल्याने सर्व जण सहपरिवार हा चित्रपट पाहत आहेत.

१० वर्षांपूर्वी नागराज मंजुळे कृत सैराट चित्रपट प्रदर्शित झाला होता त्यानं मागील सर्व मराठी चित्रपटांचे रेकॉर्ड ब्रेक करत नवीन ११० कोटींचा जबरदस्त असा नवीन रेकॉर्ड स्थापन केला, परंतु "राजा शिवाजी" ह्या चित्रपटाने सैराट ला सुद्धा मागे टाकले आहे. या नवीन चित्रपटाने गेल्या १८ दिवसांमध्येच ११४.८ कोटींचा टप्पा पार केला आहे. अजून बरेच दिवस हा चित्रपट बॉक्स ऑफिस वर आपले वर्चस्व नक्कीच राखील.

मराठी चित्रपट सृष्टी आता हिंदी सिनेमांना तोडीस तोड असे नवनवीन सिनेमे काढून आपले वर्चस्व नव्याने उभारत आहे.

म्हणूनच काय, हिंदी सिनेमामधील कलाकार आता मराठी सिनेमांकडे वळू लागले आहेत. रितेश आणि जिनीलिया यांच्यावर सर्व स्तरांमधून कौतुकांचा वर्षाव होतं आहे व त्यांचे अभिनंदन सुद्धा केले जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सिल्लोड तालुक्यात अवैध वाळू साठ्यांवर महसूलची धडक कारवाई

## धानोरा येथील घटना ; जप्त वाळू १५ घरकुल लाभार्थ्यांना मोफत वितरित

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील धानोरा येथे अनधिकृतपणे साठवून ठेवण्यात आलेले अवैध वाळूचे साठे महसूल प्रशासनाने रविवार रोजी पहाटे अचानक छापा टाकून जप्त केले . या धडक कारवाईनंतर जप्त करण्यात आलेली संपूर्ण वाळू तात्काळ त्याच ठिकाणाहून ग्रामीण भागातील १५ घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप करण्यात आली. महसूल विभागाच्या या अनपेक्षित कारवाईमुळे अवैध वाळू साठवणूक करणाऱ्यांमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

धानोरा शिवारात मोठ्या प्रमाणावर वाळूची अवैध साठवणूक करण्यात आल्याची गोपनीय माहिती महसूल प्रशासनाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे रविवार (दि. १७) रोजी पहाटे महसूलच्या महिला अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालील पथकाने या वाळू साठ्यांवर अचानक छापा टाकला. या मोहिमे दरम्यान पथकाने सर्व अनधिकृत वाळू साठे कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून जप्त केले.

केवळ कारवाई करून न थांबता, प्रशासनाने एक कौतुकास्पद पाऊल उचलत शासन नियमानुसार या जप्त केलेल्या वाळूचे जागेवरच गरजू १५ घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाटप केले. यामुळे लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### महिला अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात धडक मोहीम

**ही संपूर्ण कारवाई प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी तथा तहसीलदार अंकिता ताकभाते, भराडीच्या मंडळ अधिकारी रुक्मिणी माने आणि बोरगावच्या मंडळ अधिकारी अनिता डुमणे या महिला अधिकाऱ्यांच्या पथकाने राबवली.या मोहिमेत अंभईचे मंडळाधिकारी अप्पासाहेब सोनवणे, ग्राम महसूल अधिकारी परमेश्वर ढेपले, पोपट तायडे, अनिकेत वाघ आणि वाहनचालक कलीम यांनी सहकार्य केले.**

**...तर कायदेशीर कारवाई करणार!**

"तालुक्यात इतरत्र कुठेही अशा प्रकारे अवैध वाळूचे साठे आढळल्यास ते जप्त केले जातील. तसेच संबंधित अवैध साठवणूक करणाऱ्यांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे कुणीही अनधिकृतपणे वाळूचे साठे करू नयेत."

**— अंकिता ताकभाते (प्रशिक्षणार्थी उपजिल्हाधिकारी तथा तहसीलदार, सिल्लोड)**

# सणसरमध्ये गडकरींची गाडी अडवून नागरिकांचे निवेदन

## तांत्रिक अडचणी सोडवण्याचे आश्वासन

**दैनिक युवक आधार**

**इंदापूर : विकास क्षत्रिय** : श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग (NH-965G) च्या कामाची पाहणी करण्यासाठी आलेले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना सणसर (ता. इंदापूर) येथे ग्रामस्थांच्या रोषाला सामोरे जावे लागले. पाहणीदरम्यान नागरिकांनी गडकरी यांची गाडी थांबवून विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर निवेदन सादर केले.ग्रामस्थांनी विशेषतः सणसर–कुरवली रस्त्यावर योग्य ठिकाणी सर्कल किंवा अंडरपास उभारावा,तसेच सणसर ग्रामपंचायत कमानीसमोर अंडरपास करण्यात यावा,अशी मागणी ग्रामस्थ शिवाजी काळे यांनी केली. याशिवाय चुकीच्या ठिकाणी उभारण्यात आलेले अंडरपास रद्द करावेत,असेही त्यांनी स्पष्ट केले.

श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग (NH-965G) चे अपूर्ण काम तात्काळ पूर्ण करावे,तसेच सुरू



असलेले सर्व्हिस रोडचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.सणसर हद्दीत सर्व्हिस रोडची उंची कमी करावी आणि सणसर सोसायटी ते जगदाळे वस्ती या दरम्यान दोन्ही बाजूंनी सर्व्हिस रोड रुंद करावा, अशीही मागणी सरपंच यशवंत पाटील यांनी केली.वाहतूक व प्रवाशांच्या सोयीसाठी पालखी महामार्गाच्या दोन्ही बाजूंना एसटी पिकअप शेड व शौचालय युनिट उभारावीत, अशी मागणी नागरिकांनी केली.तसेच ग्रामपंचायत मालकीच्या पिण्याच्या पाण्याच्या सहा बोरवेल रस्त्याच्या रुंदीकरणात बाधित झाल्याने नवीन बोरवेल करून द्याव्यात,अशी मागणीही करण्यात आली. पिण्याच्या पाण्याची विहीरही या कामात नादुरुस्त झाली असून तिची नुकसानभरपाई तातडीने मिळावी,अशी अपेक्षा सरपंच यशवंत पाटील यांनी व्यक्त केली याचबरोबर सणसर गावची कमान रुंदीकरणात काढण्यात आल्याने तिची नुकसानभरपाई ग्रामपंचायतीला देण्यात यावी,अशी मागणीही निवेदनात नमूद करण्यात आली.

“सणसर–कुरवली रस्त्यावर योग्य ठिकाणी अंडरपास किंवा सर्कल नसल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. तसेच सर्व्हिस रोडची उंची,रुंदी आणि अपूर्ण कामांमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. पिण्याच्या पाण्याच्या सोयीही बाधित झाल्या आहेत.या सर्व प्रश्नांवर तात्काळ निर्णय घेऊन कामे पूर्ण करावीत, ही आमची मुख्य अपेक्षा आहे,”असे यशवंत पाटील यांनी सांगितले. ग्रामस्थांचे निवेदन स्वीकारताना गडकरी यांनी सर्व मुद्दे लक्षपूर्वक ऐकून घेतले.संबंधित तांत्रिक अडचणींचा आढावा घेऊन योग्य त्या ठिकाणी निर्णय घेण्याचे आश्वासन त्यांनी दिले. त्यानंतर त्यांनी पुढील पाहणीसाठी प्रस्थान केले.

या घटनेमुळे श्री संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग (NH-965G) च्या कामातील स्थानिक अडचणी पुन्हा एकदा समोर आल्या असून, प्रशासनाने तातडीने यावर कार्यवाही करावी,अशी अपेक्षा सणसर मधील नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक

## निविष्ठांच्या सुरळीत पुरवठ्यासाठी अचूक नियोजन करा – पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ प्रतिनिधी** : अकोला खरीप हंगामासाठी जिल्ह्यात बी–बियाणे, खते आदी निविष्ठांची कुठेही कमतरता भासू नये यासाठी अचूक नियोजन ठेवा. निविष्ठांचा काळा बाजार कुठेही होता कामा नये अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा राज्याचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिला.



पालकमंत्री ॲड. फुंडकर यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर, प्रकाश भारसाकळे, हरिश पिंपळे, नितीन देशमुख, किरण सरनाईक, साजिदखान पठाण, जिल्हाधिकारी वर्षा मीना, जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मुरली इंगळे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री ॲड. फुंडकर म्हणाले की, जिल्ह्यात खते, बियाणे आदी निविष्ठांची कुठेही उणीव भासू नये म्हणून नियोजन सादर करताना योग्य व परिपूर्ण आकडेवारी असावी. निविष्ठांची तालुकानिहाय आवश्यकता व उपलब्धता स्पष्ट असली पाहिजे. तालुका नियोजन करताना लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेतल्या पाहिजेत. तशी तयारी करून व मान्यवर लोकप्रतिनिधींच्या सूचना विचारात घेऊन अचूक माहिती सादर करावी जेणेकरून राज्यस्तरीय बैठकीत पाठपुरावा करण्यात येईल. जिल्ह्यात सर्वदूर पुरवठा सुरळीत व्हावा. निविष्ठांचा काळाबाजार, लिंकिंग असे प्रकार झाल्यास कठोर कारवाई करण्यात येईल.

ते पुढे म्हणाले की, कृषी विभागाकडून वेळोवेळी होणा-या कार्यवाहींची माहिती शेतकरी बांधवांना वेळेत झाली पाहिजे. त्यासाठी जिल्हा वॉररूमसारख्या यंत्रणेचा वापर व्हावा. आपत्तीप्रसंगी पंचनामे करताना ते परिपूर्ण होतील व कुणीही आपत्तीग्रस्त वंचित राहणार नाही, याची खबरदारी घ्यावी. ‘महावितरण’कडून वितरण रोहित्र (डीपी) संच तालुक्यात मध्यवर्ती ठिकाणी उपलब्ध ठेवावेत जेणेकरून गरज असेल तिथे ते वेळेवर पोचवता येतील व वीजपुरवठा तत्काळ सुरळीत होईल, असे निर्देश त्यांनी दिले. खरीप हंगामासाठी कर्जवितरणाला गती द्यावी. एकही पात्र शेतकरी वंचित राहता कामा नये, असेही निर्देश त्यांनी दिले.

बियाण्यांची उगवण न झाल्यास कंपनीवर तत्काळ कारवाई, शेतक-यांना वेळेत सूचना देणे, आदी निर्देश देण्यात आले.

# जिल्हाधिका-यांकडून मान्सूनपूर्व तयारीचा आढावा

## मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करा - जिल्हाधिकारी वर्षा मीना

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : अकोला जिल्ह्यात नालेसफाई, नादुरुस्त पूल, रस्ते, प्रकल्पांची दुरूस्ती आदी मान्सूनपूर्व कामे वेळेत पूर्ण करावी. धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नोटीसा द्याव्यात. त्याचप्रमाणे, तहसील स्तरावरील, तसेच आरोग्य, नगरपालिका, महापालिका, साबांवि, पाटबंधारे आदी विभागांचे नियंत्रण कक्ष १ जूनपासून सुरू करावेत, असे निर्देश अकोला जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.



मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेण्यासाठी बैठक जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेत झाली, त्यावेळी त्या बोलत होत्या. निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे व विविध यंत्रणाप्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मीना म्हणाल्या की, शहरातील इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून धोकादायक इमारतींबाबत संबंधितांना सूचना द्यावी. दुषित पाण्यासंदर्भात तपासण्या वाढवा. जिल्ह्यात ५३ महसूल मंडळ स्तरावर रेनगेज व ॲटोमॅटिक वेदर स्टेशन यंत्रणा कार्यान्वित आहे. या यंत्रणेची तपासणी व आवश्यक तिथे दुरूस्ती करून घ्यावी.

जिल्ह्यात पूर्णा, मोर्णा, काटेपूर्णा, पठार, वान, गौतमा, मन, मस, विश्वमित्रा, उमा, पेढी, निर्गुणा, खाईनदी, विद्रुपा नद्या वाहतात. तसेच, ८३ पूरबाधित गावे आहेत. वारंवार आपत्कालीन घटना झालेली १० ठिकाणे आहेत. अशा ठिकाणी वेळीच सूचना देण्यासाठी फलक, संदेशवहन यंत्रणा, नियंत्रण कक्ष आदी व्यवस्था व्हावी. आवश्यक तिथे निवा-यांची सोय, तसेच सर्व प्रकल्पांची दुरूस्ती करावी, बिनतारी यंत्रणा स्थापित करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

त्या पुढे म्हणाल्या की, पावसाळा लक्षात घेता धोकादायक होर्डिंग्ज, जीर्ण झाडे काढावीत. जिल्हा व तहसील स्तरावरील शोध व बचाव पथकाचे प्रशिक्षण पूर्ण करावे. त्यांना आवश्यक लाईफ जॅकेट, रिंग, रोप, बोट, इमर्जन्सी लाईट आदी साहित्य उपलब्ध करून घ्यावे. शहरातील नालेसफाई, नदीनाल्याच्या प्रवाहातील अडथळे दूर करावेत. पावसाळ्यात अस्वच्छतेमुळे रोगराई पसरण्याची शक्यता असते. त्यामुळे स्वच्छता कामे पूर्ण करावीत, तसेच आरोग्य केंद्रे, पथके सुसज्ज ठेवावीत. महावितरणकडून वीजवाहिन्यांजवळील धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी, खांब कोसळल्यास वेळीच उपाययोजनेसाठी यंत्रणा आदी कामे पूर्ण करून वीजपुरवठा खंडित होणार नाही याची दक्षता घ्यावी. असे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा प्रतिसाद

## इलेक्ट्रिक कारचा वापर सुरु करत ताफ्यातील वाहनांची संख्या केली कमी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई ( प्रतिनिधी ) :** - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर केलेल्या ‘इंधन बचत आणि पर्यावरण संवर्धन’ या आवाहनाला प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आदर्श घालून दिला आहे. त्यांनी आपल्या दैनंदिन वापरासाठी इलेक्ट्रिक कारचा स्वीकार करत हरित ऊर्जा आणि स्वच्छ पर्यावरणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

इलेक्ट्रिक कारच्या वापरासोबतच त्यांनी आपल्या ताफ्यातील वाहनांची संख्या देखील कमी केली आहे. “जागतिक ऊर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासह इंधन बचत ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. छोट्या-छोट्या कृतींमधूनही मोठा बदल घडवून आणता येतो” असा संदेश उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजितदादा पवार यांनी आपल्या कृतीतून दिला आहे.

# आठ लाख 95 हजाराची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** गुंतवणूक केलेल्या रुपयांच्या नफ्यावर 30 टक्के कमिशन देण्याचे आमिष दाखवले आणि आठ लाख 95 हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात 17 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.यातील आरोपी यांनी फिर्यादी सुहास फडतरे (राहणार सेक्टर 22, कामोठे) यांना फेसबुकवर मेसेज पाठवला. त्यानंतर व्हाट्सअप नंबर पाठवून त्यामध्ये क्रिप्टो करेंसी प्लॅटफॉर्म बद्दल माहिती दिली. यावेळी आरोपीने सुहास यांना जास्त गुंतवणूक केली तर शंभर टक्केपेक्षा जास्त नफा मिळेल असे सांगितले.

यावेळी सुरुवातीला त्यांनी दहा हजार रुपये गुंतवले. त्यांना 11 हजार 797 इतकी रक्कम परताव्यासह बँक खात्यात जमा केली. त्यानंतर गुंतवणूक सल्लागाराचा टेलिग्राम आयडी दिला आणि त्यात जॉईन होण्यास सांगितले. यावेळी झालेल्या नफ्यावर 30 टक्के कमिशन देण्याचे आरोपी याने ऑनलाईन करार करून खोटा नफा दाखवला आणि फिर्यादी यांची एकूण आठ लाख 95 हजाराची फसवणूक केली.

# कामगार उपायुक्त कार्यालयावर बांधकाम कामगारांचे भव्य आंदोलन

## गृहपयोगी व सुरक्षा संच हडप केल्याचा गोडाऊन चालकांवर गंभीर आरोप; १५ दिवसांचा दिला अल्टिमेटम

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगरयोगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : बांधकाम कामगारांच्या विविध प्रलंबित आणि न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी नुकतेच कामगार उपायुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या कार्यालयासमोर 'कामगार कल्याण समिती' व 'शिवशक्ती असंघटित कामगार युनियन'च्या वतीने भव्य आंदोलन करण्यात आले. या आंदोलनादरम्यान कामगारांनी प्रशासनाच्या ढिसाळ कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करत संपूर्ण परिसर दणाणून सोडला होता. "भ्रष्टाचार करणाऱ्यांना माफी नाही", "कामगारांवर अन्याय चालणार नाही" अशा मागण्यांचे फलक हाती घेऊन आंदोलकांनी उपस्थित सर्वांचे लक्ष वेधले. आंदोलनानंतर कामगार उपायुक्तांना मागण्यांचे सविस्तर कायदेशीर निवेदन सादर करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान कामगार नेत्यांनी व आंदोलकांनी पुरवठा साखळीतील गंभीर गैरव्यवहारावर बोट ठेवले. गोडाऊन चालकांकडून




कामगारांचा केवळ ओटीपी घेतला जातो आणि बोगस बायोमेट्रिक करून कामगारांच्या हक्काचे गृहपयोगी व सुरक्षा संच सर्रास हडप केले जात असल्याचा गंभीर आरोप आंदोलकांनी निवेदनात केला आहे. हक्काच्या लाभापासून वंचित ठेवण्याच्या या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर तात्काळ कठोर कायदेशीर व न्यायालयीन कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे. कामगारांची केवायसी प्रक्रिया पूर्ण होताच त्यांना कोणत्याही विलंबाशिवाय तात्काळ साहित्य देण्याची चोख व्यवस्था प्रशासनाने करावी, तसेच गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी प्रत्येक गोडाऊनवर कामगार कार्यालयाचा एक अधिकृत प्रतिनिधी कायमस्वरूपी उपस्थित ठेवण्यात यावा, जेणेकरून साहित्याचे वाटप पारदर्शक पद्धतीने होईल, असेही निवेदनात नमूद केले आहे.

कामगारांच्या नवीन नोंदणी, नूतनीकरण आणि विविध कल्याणकारी योजनांचे लाभ मिळण्याचे अर्ज वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवले जात असल्याबद्दल यावेळी तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. हे सर्व अर्ज तात्काळ आणि कालबद्ध पद्धतीने निकाली काढण्यात यावेत, तसेच अर्जामध्ये काही तांत्रिक त्रुटी किंवा चुका आढळल्यास, त्या दुरुस्त करण्यासाठी कामगारांना किमान सात (७) दिवसांची कायदेशीर मुदत देण्यात यावी, जेणेकरून तांत्रिक कारणास्तव कोणताही पात्र कामगार लाभापासून वंचित राहणार नाही, अशी मागणी आंदोलकांनी लावून धरली. कामगार उपायुक्तांना निवेदन सादर करताना आंदोलकांनी स्पष्ट इशारा दिला की, प्रशासनाने या सर्व मागण्यांचा गांभीर्याने विचार करून येत्या १५ दिवसांच्या आत त्यावर सकारात्मक निर्णय न घेतल्यास, यापुढील काळात प्रशासनाच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे रस्त्यावरील आंदोलन छेडण्यात येईल, तसेच या भ्रष्टाचाराविरोधात कायदेशीर आणि न्यायालयीन लढाई लढण्यासही मागे हटणार नाही.

या भव्य आंदोलनाचे नेतृत्व आणि निवेदनावर दीपक थोरात, प्रेम चव्हाण, सलीम शहा, नीलेश उजगरे, प्रदीप इंगळे, फकीरचंद औचरमल, सुभाष अनावडे, वाहेद पठाण, गौतम जमधडे, अजय मगरे, जगदीश बावस्कर (तालुकाध्यक्ष), हिराजी जंजाळ आणि रोशन वारे या १३ प्रमुख पदाधिकारी व कामगार नेत्यांच्या अधिकृत स्वाक्षऱ्या आहेत.

या आंदोलनाप्रसंगी शिवशक्ती असंघटित कामगार युनियन व कामगार कल्याण समितीचे सर्व प्रमुख पदाधिकारी, महिला व पुरुष बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नीट (NEET) घोटाळ्याप्रमाणे MH–CET मध्येही मोठा घोटाळा

## दहावी बारावीला अत्यंत कमी मार्क्स असलेल्यांना CET मध्ये १०० पर्सेंटाईल्स कसे? : सचिन सावंत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** देशभरात (NEET) पेपरफुटीने विद्यार्थी व पालकांची चिंता वाढली असून आयुष्याच्या महत्वाच्या टप्प्यावर जर तरुणपिढीला फसवले जात असेल तर ही देशाची सुद्धा फसवणूकच आहे. NEET पेपरफुटीची चौकशी सुरु असली तरी अशा चौकशातून पुढे काहीही निष्पन्न होत नाही. नीट सारखाचा गडबड घोटाळा MH – CET परिक्षेतही झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. दहावी बारावीला जेमतेम ३५-४० टक्के मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्यांना MH – CET मध्ये १०० पर्सेंटाईल्स पडलेले आहेत, हा घोटाळा असून त्याची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींनी कठोर शिक्षा करा, अशी मागणी अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सचिव व तेलंगणाचे सहप्रभारी सचिन सावंत यांनी केली आहे.

टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी MH – CET परिक्षेतील घोटाळ्यावर बोलताना सचिन सावंत पुढे म्हणाले की, या परिक्षेचा अभ्यासक्रम हा ११-१२ वीचा असतो, १० वी १२ परिक्षेत जेमतेम मार्क्स मिळवलेल्या २२ विद्यार्थ्यांना एमएच सीईटीमध्ये मात्र १०० पर्सेंटाईल मिळालेले आहेत. ज्या विद्यार्थ्याला १० व्या परिक्षेत ३७ टक्के मार्क्स मिळाले त्याला एमएच सीईट मध्ये ९९.९७१ टक्के पर्सेंटाईल मिळाले आहेत. बारावीत ज्यांना ५१ टक्के मार्क्स मिळाले अशा दोन विद्यार्थ्यांना एमएच सीईटमध्ये १०० पर्सेंटाईल, ४५ टक्के मार्क्स पडलेल्याला १०० पर्सेंटाईल व ३९ टक्के मार्क्स पडलेल्या विद्यार्थ्याला १०० पर्सेंटाईल पडलेले आहेत. बारावीला ज्या विद्यार्थ्याला ३५ मार्क्स पडले त्यालाही १०० पर्सेंटाईल पडले आहेत. MHT-CET गणितात १०० पर्सेंटाइल मिळवलेल्या रँक १, २, ३, ४, ५, ६, १५ , १६ , १७ आणि १८ या सर्व विद्यार्थ्यांचे HSC गणितातील सरासरी गुण फक्त ६४.३% होते. या राज्यातील दहा अव्वल विद्यार्थ्यांपैकी सहा जणांचे गुण या सरासरीपेक्षाही कमी होते —



त्यांचे HSC गणितातील गुण अनुक्रमे ६०, ५४ , ५३ , ५३, ४० आणि ३५ होते. CET मधील टॉप २० रँकर्सपैकी ६ विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेत ६०% पेक्षाही कमी गुण मिळाले. रँक १, २, ५, १२, १५ आणि १८ — ज्यांचे CET पर्सेंटाइल ९९.९९ किंवा त्यापेक्षा जास्त आहे — यांना HSC PCM मध्ये ६०% पेक्षा कमी गुण मिळाले. एका टॉपर ला CET गणितात १०० पर्सेंटाइल मिळाले, पण बोर्डातील एकूण PCM गुण फक्त ३९ % होते. टॉप २० मधील १० विद्यार्थ्यांना CET गणितात परफेक्ट १०० पर्सेंटाइल मिळाले. मात्र त्यांच्या HSC गणितातील गुण ३५ ते ९७ या दरम्यान आहेत — म्हणजे तब्बल ६२ गुणांचे अंतर. एका ला CET गणितात १०० पर्सेंटाइल, पण HSC गणितात फक्त ३५% गुण — म्हणजे ६५ गुणांचे अंतर. HSC, PCM मध्ये फक्त ३९% गुण असूनही राज्यातील टॉप २० मध्ये स्थान मिळाले आहे. रँक ६६ चा डेटा देखील गंभीर प्रश्न निर्माण करणारा आहे. या विद्यार्थ्याला १० वीला गणितात २२ मार्क्स मिळाले होते, तर १२ वी ३३ मार्क्स मिळाले म्हणजे तो गणितात सपशेल नापास आहे, पीसीएम मध्ये ४७.६७ टक्के मार्क्स आहेत त्याला सीईटी मध्ये मात्र ९९.९७१ पर्सेंटाईल मिळाले आहेत. CET मध्ये अत्यंत उच्च पर्सेंटाइल मिळवूनही बोर्ड परीक्षेतील कामगिरी त्याच प्रमाणात दिसत नाही. अशा उदाहरणांमुळे CET आणि HSC या दोन्ही मूल्यमापन पद्धतींमध्ये मोठी विसंगती असल्याचे अधिक स्पष्ट होते. हा चमत्कार कसा झाला, याचे उत्तर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी द्यावे. तसेच या परिक्षा कोण नियंत्रित करतो, या परिक्षांवर जोशी नामक व्यक्तीचा काय संबंध आहे, याचाही खुलासा केला पाहिजे, असे सावंत म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी परिक्षा पे चर्चा वर दरवर्षी मोठे प्रवचन देत असतात पण त्यांच्याच कार्यकाळात व्यापम सारखे परिक्षा घोटाळे फोफावत आहेत ही चिंतेची बाब आहे. भारतीय जनता पक्षाचे सरकार असलेल्या राज्यातच परिक्षेत गडबड घोटाळे वाढले आहेत व त्या घोटाळ्यातील लोकांचे संबध भाजपा नेत्यांशी असल्याचे उघड झाले आहेत. एमएच सीईटीच्या परिक्षेतील घोटाळ्यावर मी एक्स या सोशल मीडियावरून एक पोस्ट केली होती, त्यावर या परिक्षा घेणाऱ्या सेलकडून यादी अस्पष्ट आहे असा खुलासा करण्यात आला आहे. या यादीतीला विद्यार्थ्यांची नावे सार्वजनिक होऊ नयेत म्हणून ती झाकण्यात आली होती. आता मी पुन्हा एमएच सीईटी कमिशनला एक यादी व पत्र देणार आहे, त्यावर त्यांनी खुलासा करावा. एमएचसीईट परिक्षा सेलमध्ये मागील ८-१० वर्षे तेच अधिकारी काम करत असून त्यांच्या बदल्याही झालेल्या नाहीत. नीट, एमएच-सीईट सारख्या परिक्षा विद्यार्थ्यांच्या भवितव्य ठरवणाऱ्या असतात त्यात अशा प्रकारे घोटाळे करून लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका असेही सचिन सावंत म्हणाले..

# उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूचा गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेत समावेश करा

## पीआरपीचे तालुकाध्यक्ष सतिश पाडवे यांची कृषीमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे :** राज्यातील वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शेतातील कामे करताना उष्माघातामुळे शेतकऱ्यांचे मृत्यू होत असून शासनाच्या कृषी विभागाच्या गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेत उष्माघातामुळे शेतकरी मृत्यूचा समावेश करण्यात यावे,अशी मागणी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे तालुकाध्यक्ष सतिश पांडवे यांनी देगलूरचे उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

राज्य शासनाच्या कृषी विभागामार्फत राबविण्यात येणारी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना ही शेतकरी कुटुंबांना संकट काळात आर्थिक आधार देणारी महत्त्वपूर्ण कल्याणकारी योजना आहे.मात्र या योजनेत उष्माघातामुळे



होणाऱ्या मृत्यूबाबत स्पष्ट तरतूद नसल्याने अनेक शेतकरी कुटुंबे मदतीपासून वंचित राहत आहेत.सध्या राज्यात तीव्र उष्णतेची लाट असून अनेक भागांमध्ये तापमान ४४ ते ४६ अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचत आहे.

अशा परिस्थितीत शेतकरी हळद,कांदा,भुईमूग आदी पिकांची काढणी तसेच खरिप हंगामपूर्व मशागतीची कामे करत आहेत.कडक उन्हात दीर्घकाळ काम करताना उष्माघातामुळे शेतकऱ्यांचे मृत्यू होत असल्याच्या घटना वाढत असल्याने शासनाने तातडीने या गंभीर प्रश्नाची दखल घेण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. उष्माघातामुळे होणाऱ्या शेतकरी मृत्यूंचा अपघात विमा योजनेत समावेश केल्यास मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळून मोठा दिलासा मिळेल,अशा आग्रही मागणीचे निवेदन नायब तहसीलदार विलास तेलंग यांना पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे देगलूरच्या वतीने देण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष सतीश पांडवे,सूर्याजी पाटील जाधव,प्रा.निवृत्ती भागवत,किरण कांबळे,देवेंद्र कांबळे व गौतम वनंजे आदी उपस्थित होते.

# खारघर पोलीसांकडुन जबरी चोरी, घरफोडी, मोबाईल चोरी व हरविलेले मोबाईल फोन, रोख रक्कम व सोन्याचे दागिने हस्तगत करुन मुळ मालकांना परत केलेबाबत

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, वार्ताहर :** खारघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सन 2025-2026 मध्ये शस्त्राचा धाक दाखवुन जबरी चोरी करुन सोन्याच्या दागिन्यांची लुट, बनावट चावीचा वापर करुन घरातील लाखो रुपये रोख रक्कम चोरी, तसेच मोबाईल फोन चोरी आणि हरवलेले मोबाईल फोन असा लाखो रुपये किंमतीचा मुद्देमाल खारघर पोलीसांकडुन तंत्रशुध्द तपास करुन महाराष्ट्रातील मुंबई, ठाणे, नवी मुंबई, पुणे, सांगली सह राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, मध्य प्रदेश, कर्नाटक, दिल्ली, झारखंड इत्यादी राज्यांमधुन सातत्याने पाठपुरावा करुन सोन्याचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन हस्तगत केलेले आहेत.

खारघर पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.नं. 176/2026 भा.न्या.सं. कलम 61(2), 309 (6), 3(5) मध्ये खारघर येथील प्रतिष्ठीत व्यक्तीला चाकुने वार करुन त्याचे एकुण 57 तोळे वजनाचे सोन्याचे दागिने लुटले होते. सदर गुन्ह्यामध्ये एकुण 7 आरोपी अटक करुन त्यांच्याकडुन 57 लाख रुपये किंमतीचे 57 तोळे वजनाचे दागिने सांगली जिल्ह्यातुन हस्तगत केले आहेत. खारघर पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.नं. 175/2026 भा.न्या.सं. 305 मध्ये खारघर येथील एका महिलेच्या घराचा दरवाजा बनावट चावीने उघडुन घरातील एकुण 27 लाख रुपये रोख रक्कम चोरी केली होती. सदर गुन्ह्यामध्ये 2 आरोपी अटक करुन त्याच्याकडुन गुन्ह्यात चोरी केलेले पुर्ण 27 लाख रुपये रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे खारघर पोलीस ठाणे हद्दीमध्ये सन 2025 व सन 2026 मध्ये हरवलेले तसेच चोरीस गेलेले मोबाईल फोन उएखठ झेींरश्र च्या माध्यमातुन तांत्रिकदृष्ट्या शोध घेवुन महाराष्ट्रासह, राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, मध्य प्रदेश, कर्नाटक, दिल्ली, झारखंड इत्यादी राज्यांमधुन प्रत्यक्ष जावुन, तसेच स्थानिक पोलीसांच्या मदतीने शोध घेवुन एकुण 10 लाख 74 हजार रुपये किंमतीचे एकुण 50 मोबाईल फोन हस्तगत केलेले आहेत. एकंदरीत खारघर पोलीसांकडुन गुन्ह्यांमधील सोन्याचे दागिने, रोख रक्कम व हरवलेले मोबाईल फोन असा एकुण 94 लाख 74 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन आज रोजी सदरचा मुद्देमाल त्यांच्या मुळ मालकांना परत करण्यात येत आहे.


सदरची कामगिरी सहा. पोलीस आयुक्त, खारघर विभाग, विक्रम कदम यांचे मार्गदर्शनाखाली खारघर पोलीस ठाण्याचे वपोनि संजय जोशी, पोनि. अशोक डमाळे, पोनि. सुरज पाटील, पोनि शितल पाटील, सपोनि शरद बरकडे, पोउपनि सुरज जाधव व खारघर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार सपोफौ आगा, पोहवा कासार, तरकसे, पोना बाबरे, खेडकर, पोशि खैरे, माळी, मोरे, यांनी केली आहे. तसेच मोबाईल फोन हस्तगत करण्याची विशेष कामगिरी पोशि मोतीराम आगिवले यांनी केलेली आहे.

# नागरिकांच्या संतापानंतर अमरधाम स्मशानभूमीत आता बसणार 2000 लिटरची टाकी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,(वार्ताहर) :** पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यविधीसाठी पाणी उपलब्ध नसल्याने नातेवाईकांना चक्क बिसलेरीच्या पाण्याच्या बाटल्या विकत आणून अंतिम विधी करावा लागल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या ढिसाळ कारभारामुळे मृतकांच्या नातेवाईकांसह स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, स्मशानभूमीत एकाच वेळी दोन मृतदेह अंत्यसंस्कारासाठी आले होते, मात्र तिथे पाणीच नव्हते. नातेवाईकांनी तात्काळ पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाशी आणि टँकरसाठी संपर्क साधला, पण वेळेत टँकरही उपलब्ध होऊ शकला नाही. अखेर नाईलाजास्तव नातेवाईकांनी बाहेरून बिसलेरीच्या पाण्याच्या बाटल्या आणून विधी पूर्ण केला. या घटनेनंतर नागरिकांनी पालिकेवर जोरदार टीका केली. यावर स्पष्टीकरण देताना ठेकेदाराच्या कर्मचाऱ्याने आधी पाच मृतदेह आल्यामुळे



500 लिटर पाणी संपले, असे कारण पुढे केले होते. मात्र, कर्मचाऱ्याने दिलेले हे कारण चुकीचे असल्याचे सांगत पालिकेने ते फेटाळून लावले आहे. स्मशानभूमीसारख्या संवेदनशील ठिकाणी पाण्याच्या अपुऱ्या व्यवस्थेबाबत ठेकेदाराने आणि त्याच्या कर्मचाऱ्यांनी आधीच जागृत राहायला हवे होते, असे सांगत पालिकेने संबंधित ठेकेदाराला कडक सूचना दिल्या आहेत. दरम्यान, प्रशासनाने या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून येथील 500 लिटरची जुनी टाकी हटवून आता 2000 लिटर क्षमतेची नवीन टाकी बसवण्याचा निर्णय घेतला आहे. ही 2000 लिटरची टाकी भविष्यात पुरेशी राहील आणि नागरिकांची गैरसोय टळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# ज्ञानाई–तुकाई गुरुकुलात भव्य दिव्य अखंड अष्टदिनी कीर्तन महोत्सव; आठ दिवस रंगणार भक्ती, ज्ञान व कीर्तनाची मेजवानी

**दैनिक युवक आधार**

**आष्टी, प्रतिनिधी : बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्यातील माऊली नगर येथील ज्ञानाई–तुकाई गुरुकुलामध्ये २१ मे ते २८ मे २०२६ या कालावधीत भव्य दिव्य अखंड हरिदिनी कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवात विविध नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार व हरिभक्त परायण महाराजांच्या उपस्थितीत भक्तीरसाची अनोखी पर्वणी अनुभवण्याची संधी भाविकांना मिळणार आहे.

आदरणीय भागवताचार्य, ज्ञानसिंधू, अभंग सारस्वत ह.भ.प. आदिनाथ महाराज दानवे गुरुजी यांच्या संकल्पनेने व प्रेरणेने आयोजित करण्यात आलेला हा महोत्सव वारकरी संप्रदायातील भक्तीपरंपरा जपणारा तसेच संत साहित्य,



अभंग विचार आणि अध्यात्मिक संस्कार यांचा प्रसार करणारा ठरणार असल्याची भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी गीता पाठ, त्यानंतर कीर्तन सेवा, दुपारच्या सत्रात प्रवचन तसेच सायंकाळी हरिपाठ आणि रात्री कीर्तन अशा विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमानंतर महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली असून परिसरातील भाविकांसह विविध भागांतील वारकरी, भक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

महोत्सवात विविध क्षेत्रांतील कीर्तनकारांकडून संत परंपरा, अभंग निरूपण, समाजप्रबोधन, संस्कार, भक्तीमार्ग तसेच संतांच्या जीवनकार्यावर आधारित विचार मांडले जाणार आहेत. संत साहित्याचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि युवकांमध्ये अध्यात्मिक संस्कार रुजविणे हा या महोत्सवामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.

गेल्या अनेक वर्षांपासून ज्ञानाई–तुकाई गुरुकुलामार्फत विविध धार्मिक, आध्यात्मिक व समाजप्रबोधनात्मक उपक्रम राबविले जात असून यंदाचा अखंड अष्टदिनी कीर्तन महोत्सवही भक्तिमय वातावरणात संपन्न होणार आहे. या माध्यमातून समाजात सद्भावना, अध्यात्मिक जागृती आणि संत विचारांची जपणूक व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आयोजित करण्यात आलेल्या या सोहळ्यात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्रवणसुखाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ज्ञानाई–तुकाई गुरुकुल परिवार, माऊली नगर आष्टी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

**आयोजक : ज्ञानाई–तुकाई गुरुकुल परिवार, माऊली नगर आष्टी**

# मुदखेड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा उभारणीसाठी साखळी उपोषण सुरू

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : योगेश चौदंते :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा उभारणीस परवानगी मिळावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मारोती शिवाजी डुबुकवाड यांनी दि. १२ मे २०२६ रोजी मंगळवारपासून मुदखेड येथील नियोजित पुतळा स्थळी साखळी उपोषण सुरू केले आहे.

मुदखेड शहरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळा उभारणीसंदर्भात वारंवार अर्ज, निवेदने व शासनाच्या नियमानुसार आवश्यक कागदपत्रे सादर करूनही अद्याप परवानगी मिळालेली नसल्याने त्यांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे.

उपोषणकर्त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शासन निर्णय क्र. पुतळा ३११६/१४/क.३०८/२९ मंत्रालय मुंबई दि. २ मे २०१७ नुसार महापुरुषांचे पुतळे उभारण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार सुगरण प्रतिष्ठान, मुदखेड यांनी सर्व आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली असून सात सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. तसेच नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दि. ०७/०६/२०२३ व दि. २२/०४/२०२५ रोजी पत्र देत गट क्रमांक ५६७ मध्ये दोन्ही रस्त्यांपासून ३ मीटर अंतर राखून पुर्णाकृती पुतळा उभारणीबाबत योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

सुगरण प्रतिष्ठान मुदखेड या संस्थेची संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत दि. १४ ऑक्टोबर २०२२ रोजी नोंदणी झाली असून सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अंतर्गत दि. ३१ ऑगस्ट २०२३ रोजी अधिकृत नोंदणी करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने सर्व कागदपत्रे व दस्तऐवज प्रशासनाकडे सादर




करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

यासंदर्भात विशेष बाब म्हणजे, दि. १४ मार्च १९८९ रोजी नगरपालिकेच्या निधीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा खरेदी करण्यात आला होता. तसेच त्या ठिकाणी चबुतराही बांधण्यात आला आहे. मात्र तब्बल ४० वर्षांपासून हा पुतळा बंद खोलीत ठेवण्यात आल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. "महापुरुषांचा हा अपमान नाही का?" असा सवालही त्यांनी प्रशासनाला केला आहे.

या साखळी उपोषणास भारतीय बौद्ध महासभा व समता सैनिक दल यांनी समर्थन दिले आहे. तालुका अध्यक्ष प्रशांत निखाते, सरचिटणीस नागोराव लोखंडे, जनरल मेजर सुनील रा. चौदंते, डिव्हिजन ऑफिसर देविदास माणिकराव पवार, देवराज नागोबा चौदंते व वन्ने साहेब आदी पदाधिकाऱ्यांनी आंदोलनस्थळी उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला.व प्रहार दिव्यांग क्रांती संघटना मुदखेड, राष्ट्रीय कोंग्रेस पक्ष व एम आय एम,पक्ष या संघटनेने देखील या साखळी उपोषणास जाहीर पाठिंबा दिला आहे आणि या अगोदर ही मा. श्रीजया अशोकराव चव्हाण भोकर आमदार व माझी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण माझी खासदार आणि खासदार रवींद्र चव्हाण यांना अनेक वेळेस वेळोवेळी निवेदने देण्यात आले आहे तरी देखील आतापर्यंत कोणीही दखल घेतलेली नाही

उपोषणकर्त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ दखल न घेतल्यास मुदखेड नागरिकांच्या वतीने दि. ०१ जून २०२६ रोजी नियोजित जागेवर ३ मीटर जागा सोडून नाईलाजाने पुर्णाकृती पुतळा उभारणीचे काम सुरू करण्यात येईल.

## श्री . छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि . बा. पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई विद्यालयातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल दिनांक १८ मे २०२६ रोजी जाहीर करण्यात आला. या परीक्षेमध्ये श्री.छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि .बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.इयत्ता पाचवीच्या स्कॉलरशिप परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांमधून कु. घनगाव कनिष्का संजय , कोळी मानस महेंद्र , मन्सुरी मो. अदनान नौशाद ,मोरे प्रथमेश प्रमोद हे ४ विद्यार्थी परीक्षेत पात्र झाले आहेत. तर इयत्ता आठवी स्कॉलरशिप परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांमधून काळे अभय



दुर्योधन हा एक विद्यार्थी परीक्षेत पात्र झाला आहे. यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे

विद्यालयाचे चेअरमन श्री अरुण जगे साहेब , सर्व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मा.सौ के . जी .मॅडम ,उप मुख्याध्यापक श्री कुटे सर , पर्यवेक्षिका सौ मुकादम मॅडम, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# ओबीसी कॉलम नाही तर जनगणना नाही!

## मानेगावच्या महिलांचा एल्गार; ग्रामसभेत जनगणना बहिष्काराचा ऐतिहासिक ठराव

**दैनिक युवक आधार**
**रोशन खोब्रागडे लाखनी** - आगामी जनगणनेत ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलमची मागणी आता ग्रामीण भागात प्रचंड तीव्र होताना दिसत आहे. लाखनी तालुक्यातील मानेगाव येथे महिलांनी "ओबीसी कॉलम नाही तर जनगणना नाही!" असा एल्गार पुकारत थेट जनगणनेवर बहिष्कार टाकण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून, ओबीसी जनगणनेच्या आंदोलनाला आता गावागावातून नवा उर्जा मिळताना दिसत आहे.

मानेगावातील महिलांनी आपल्या मुलाबाळांच्या भविष्यासाठी, सामाजिक हक्कांसाठी आणि ओबीसी समाजाची खरी लोकसंख्या देशासमोर यावी यासाठी स्वतंत्र कॉलमची मागणी करत सरपंच आशा सिंगनजुडे यांना निवेदन दिले होते. महिलांच्या या तीव्र भावना लक्षात घेत सरपंचांनी



१९ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालयात विशेष ग्रामसभा बोलावली.

या सभेला महिलांसह ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सभेत ओबीसी समाजाच्या प्रश्नांवर जोरदार चर्चा झाली. अखेर "जोपर्यंत जनगणनेच्या फॉर्ममध्ये ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम दिला जात नाही, तोपर्यंत गावातील नागरिक जनगणनेत सहभागी होणार नाहीत," असा ठराव एकमुखाने मंजूर करण्यात आला. ग्रामसभेच्या या निर्णयाने आंदोलनाला नवे धार प्राप्त झाले आहे.

सभेनंतर गावातील शिष्टमंडळाने थेट तहसीलदार शीतल घावटे आणि गटविकास अधिकारी संदीप पानतावणे यांची भेट घेत ग्रामसभेच्या ठरावाचे निवेदन सादर केले.

शासनाने तातडीने मागणी मान्य करावी, अन्यथा आंदोलन अधिक उग्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

या शिष्टमंडळात सरपंच आशा सिंगनजुडे, उपसरपंच अजित मेश्राम, अजय नागलवाडे, योगेश सिंगनजुडे, पंकज चेटूले, सचिन चेटूले, नानाजी सिंगनजुडे, चुडामणी कंकलवार, ईश्वर गिऱ्हेपुंजे, तुषार सिंगनजुडे, अनिल शेंडे यांच्यासह गावातील महिला व प्रमुख नागरिकांचा समावेश होता.


> **"ओबीसी समाजाला त्यांचे घटनात्मक हक्क आणि सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी त्यांची अचूक लोकसंख्या समोर येणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे जनगणनेत स्वतंत्र ओबीसी कॉलम असणे ही काळाची गरज आहे. मानेगावातील महिलांनी आपल्या मुलांच्या भविष्यासाठी घेतलेला हा निर्णय कौतुकास्पद आहे. शासनाने आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास हे आंदोलन आणखी तीव्र केले जाईल."**
> **— अजित मेश्राम, उपसरपंच, मानेगाव सडक**

# डिझेल टंचाईचा स्फोट! छाबडा पेट्रोल पंपावर मध्यरात्री तोडफोड; कर्मचाऱ्यांना मारहाण, पोलीस बंदोबस्ताशिवाय इंधन विक्री अशक्य

## वाशिममध्ये कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर; पेट्रोल पंप संघटनेचा इंधन विक्री बंद करण्याचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम जिल्ह्यात निर्माण झालेल्या तीव्र डिझेल टंचाईने आता गंभीर आणि धोकादायक वळण घेतले असून पेट्रोल पंपांवरील परिस्थिती अक्षरशः नियंत्रणाबाहेर गेली आहे. डिझेल मिळवण्यासाठी ग्राहकांच्या किलोमीटरपर्यंत रांगा लागत आहेत. इंधनाचा साठा संपताच संतप्त ग्राहकांचा रोष थेट पेट्रोल पंप कर्मचाऱ्यांवर निघत असून मारहाण आणि तोडफोडीच्या घटना वाढू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर वाशिम शहरातील छाबडा पेट्रोल पंपावर १९ मे रोजी मध्यरात्री एक वाजण्याच्या सुमारास घडलेली तोडफोडीची घटना अत्यंत धक्कादायक ठरली आहे.

डिझेल संपल्याच्या कारणावरून एका मद्यधुंद तरुणाने पंपावर गोंधळ घालत




कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली आणि संतापाच्या भरात कार्यालयाच्या केबिनचा काचेचा दरवाजा फोडला. या घटनेमुळे पंपावरील कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले. सुदैवाने वाशिम शहर पोलीस स्टेशनचे कर्मचारी महादेव भीमटे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. पोलिसांच्या त्वरित हस्तक्षेपामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र या घटनेने पेट्रोल पंप चालक व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

सध्या डिझेल टंचाईच्या काळात काही ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात साठेबाजी केल्याचेही समोर येत आहे. शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन अनेक पेट्रोल पंप चालक कॅनमध्ये डिझेल देत आहेत, जेणेकरून शेतीची कामे खोळंबू नयेत. मात्र याच सुविधेचा गैरफायदा घेत काही ग्राहक दिवसातून अनेक वेळा रांगेत उभे राहून डिझेल साठवून ठेवत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे खऱ्या गरजूंपर्यंत इंधन पोहोचत नाही. डिझेल अचानक संपल्यावर रांगेतील इतर ग्राहक संतप्त होऊन पंपावरील निष्पाप कर्मचाऱ्यांवरच हात उचलत आहेत. परिणामी कामगारांमध्ये भीतीचे सावट निर्माण झाले असून अनेक कर्मचारी अशा परिस्थितीत काम करण्यास धजावत नाहीत.

पेट्रोल पंप संघटनेने प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की जिल्ह्यातील प्रत्येक पेट्रोल पंपावर चोवीस तास पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून दिला नाही तर इंधन विक्री सुरू ठेवणे अशक्य होईल. कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाल्याने पंप चालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या मते, पेट्रोल पंपांवरील परिस्थिती दिवसेंदिवस अधिक धोकादायक होत आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी तातडीने पोलीस बंदोबस्त तैनात करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा शहरातील सर्व पेट्रोल पंप बंद ठेवण्याशिवाय पर्याय उरणार नाही.डिझेल टंचाईमुळे शेतकरी, वाहनचालक, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिक हैराण झाले आहेत. दुसरीकडे पेट्रोल पंप चालक आणि कर्मचारी स्वतःच्या सुरक्षेबाबत चिंतेत आहेत. परिस्थिती इतकी गंभीर झाली आहे की इंधन वितरणासोबत कायदा व सुव्यवस्था राखणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान बनले आहे.

आता चेंडू जिल्हाधिकारी, पुरवठा विभाग आणि पोलीस प्रशासनाच्या कोर्टात आहे. प्रशासनाने तात्काळ कठोर उपाययोजना करून डिझेल पुरवठा सुरळीत करणे, साठेबाजीवर नियंत्रण आणणे आणि प्रत्येक पेट्रोल पंपावर पोलीस संरक्षण उपलब्ध करून देणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा वाशिम शहरातील सर्व पेट्रोल पंप बंद पडण्याची शक्यता असून संपूर्ण शहर अक्षरशः 'ड्राय' होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# विठ्ठल रुक्मिणी संस्थान पाटोदा येथे भव्य किर्तन महोत्सवाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)** : अधिकमासा निमित्त पाटोदा शहरातील श्री क्षेत्र विठ्ठल रुक्मिणी संस्थान, विठ्ठलनगर येथे भव्य दिव्य महिला किर्तन महोत्सव व देवी भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा संयोजिका सौ.सुनंदाताई सतीश महाराज उरणकर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला असून, पाटोदा व पंचक्रोशीतील महिला मंडळाच्या सहकार्याने हा कार्यक्रम पार पडणार आहे. या सोहळ्याचा शुभारंभ रविवार दिनांक २४ मे २०२६ रोजी होणार असून समाप्ती दिनांक ३१ मे २०२६ रोजी होणार आहे. अधिकमास तपपूर्ती सोहळ्यानिमित्त दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले




आहे. संस्थानामध्ये दररोज पहाटे ०४ ते ०६ काकडा, सकाळी ०९ ते १० तुळशी अर्चन, सकाळी १० ते १२ गाथा भजन, दुपारी ०१ ते ०४ देवी भागवत कथा, सायंकाळी ०४.३० ते ०६ हरिपाठ, सायंकाळी ०७ ते ०९ किर्तन तसेच रात्री संगीत भजन व हरिजागर असा धार्मिक कार्यक्रमांचा क्रम राहणार आहे. भाविकांसाठी भोजन प्रसादाची ही व्यवस्था करण्यात आली आहे. किर्तन महोत्सवात विविध ठिकाणांहून नामवंत महिला किर्तनकार सहभागी होणार असून त्यात ह.भ.प.संगीताताई सोळसकर, ह.भ.प.प्रतिक्षाताई जाधव, ह.भ.प. शिवांजली ताई जरांगे, ह.भ.प.योगिताताई हजारे, ह.भ.प.रेणकाताई पाखरे, ह.भ.प. माँईसाहेब धर्मराज महाराज पाटील, ह.भ.प. रजनीताई जाधव, ह.भ.प.कविताताई साबळे यांच्या किर्तन सेवा होणार आहे. तर या दरम्यान दिनांक १६ मे पासुन २३ मे पर्यंत ह.भ.प.सिंधुताई येवले महाराज यांचे धोंडे महात्म्य कथा दररोज दुपारी ०१ ते ०४ या वेळेत होणार आहे.

या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन विठ्ठल रुक्मिणी संस्थानच्या वतीने संयोजिका सौ.सुनंदाताई सतीश महाराज उरणकर यांनी केले आहे.

# ग्रामपंचायत मेंडका येथील मनमानी कारभाराविरोधात ग्रामस्थ संतप्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/प्रकाश गवारे** : पंचायत समिती मुदखेड येथे गटविकास अधिकाऱ्यांकडे धाव; रस्ते व नाल्यांच्या समस्यांनी नागरिक त्रस्त

मेंडका येथील ग्रामपंचायत कार्यालयाच्या मनमानी कारभाराविरोधात गावातील नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त करत पंचायत समिती मुदखेड येथील गटविकास अधिकारी यांच्याकडे धाव घेतली आहे. गावातील मूलभूत समस्यांकडे ग्रामपंचायत प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.गावातील रस्ते, नाल्या व स्वच्छतेच्या समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून, अनेक वेळा ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांना लेखी स्वरूपात अर्ज देऊन तसेच प्रत्यक्ष




भेटून समस्या मांडूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, मागील चार ते पाच वर्षांपासून गावात एकही ग्रामसभा घेण्यात आलेली नाही. तसेच मासिक सभाही नियमितपणे होत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे गावातील विकासकामांबाबत नागरिकांना कोणतीही माहिती मिळत नसून पारदर्शकतेचा अभाव असल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली. विशेषतः महालक्ष्मी मंदिर ते रेल्वे गेट या मार्गाची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

या रस्त्यालगतच्या नाल्यांचा उपसा न केल्यामुळे नाल्या पूर्णपणे तुंबल्या असून नळाचे पाणी व सांडपाणी रस्त्यावर साचत आहे. त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठा त्रास सहन करावा लागत असून, कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पाहणी करून रस्त्याची दुरुस्ती, नाल्यांची साफसफाई व ग्रामसभांचे नियमित आयोजन करण्याची मागणी केली आहे.

# पिस्टल काढून ठोकण्याची दिली धमकी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर :** पिस्टल काढून ठोकण्याची धमकी दिल्या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.जय नामदेव ठाकूर हे आणि त्यांचा मित्र संदीप पाटील 17 मे रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास जुई कामोठे येथून मासे पकडून एमजी हेक्टर गाडीने खारघर येथे परत येत होते. खारघर टोल नाकयाच्या पुढे जात असताना क्रेटा गाडीवरच्या चालकाने त्याची गाडी फिर्यादीच्या गाडीच्या उजव्या बाजूने टोलनाक्याच्या लेन मधून पुढे घुसवण्याचा प्रयत्न करत होता. या कारणावरून जय ठाकूर आणि आरोपी यांच्यात गाडीमध्ये शाब्दिक बाचाबाची झाली. यावेळी क्रेटा गाडीतील संचित प्रकाश रेवंडकर याने आणि चालक यासर अराफत कासिम राऊथर याने जय ठाकूर याला शिवीगाळ केली तसेच त्याचा मित्र संदीप पाटील याला सेक्टर 15, लेन्स कार्ड खारघरच्या दुकानासमोर रात्री बाराच्या सुमारास बोलावून घेऊन पुन्हा शिवीगाळ केली. यावेळी आरोपींचा मित्र सज्जन गायकर (राहणार एकटपाडा सेक्टर 36) याने त्याच्या कमरेला असलेले पिस्टल काढले आणि जय ठाकूर याच्या पोटाला लावून कोण आहे तो नामदेव ठाकूर त्याला बोलाव असे बोलून त्याला ठोकण्याची धमकी दिली.

या प्रकरणी खारघर पोलीस अधिक तपास करत आहेत.

# अवैधरित्या जुगार खेळणाऱ्या ९ इसमाविरुद्ध एल.सी.बी, गोंदिया ची कारवाई

**दैनिक युवक आधार**
**गोंदिया सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी** : मा. पोलीस अधिक्षक गोंदिया श्री. गोरख भामरे यांचे निर्देशाप्रमाणे व पोलीस पोलीस निरीक्षक श्री. पुरुषोत्तम अहेरकर, एल.सी.बी, गोंदिया यांचे मार्गदर्शनात एल.सी.बी, गोंदिया येथील पोलीस पथक दिनांक १७/०५/२०२६ रोजी जिल्हा हद्दीत अवैध धंदावर धाड करणेकामी पेट्रोलिंग करीत असता माहिती प्राप्त झाली कि पोलीस स्टेशन देवरी हद्दीत मौजा जमनापूर झुडपी जंगल परिसरात काही इसम हे ५२ तासपत्ती वर पैशाची बाजी लावून हारजीत चा जुगार खेळत आहेत. अशी गोपनीय माहिती प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन देवरी मौजा जमनापूर झुडपी जंगल परिसरात एल.सी.बी, गोंदिया पथकाने धाड टाकली असता सदर ठिकाणी इसम नामे १) नदीम नईम शेख वय ४६ वर्ष राहणार देवरी २) अविनाशसिंग श्रीसंत बहादूर वय ३८ वर्ष राहणार बामणी चारभाटा छत्तीसगढ ३) राजेश ज्ञानीराम पटले वय ३२ वर्ष राहणार कन्हाळगाव देवरी ४) सज्जाद शफी पठाण वय ३४ वर्ष राहणार साखरीटोला सालेकसा ५) बालदीपसिंग निर्मलसिंग खानूजा वय ३४ वर्ष राहणार देवरी ६) जागेश्वर धनलाल कुत्तीर वय ४१ वर्ष राहणार मुल्ला ७) प्रतिमोल सुरेश डोंगरे वय २१ वर्ष राहणार सिंधीबीरी देवरी ८) जसविंदसिंग जोगेंदरसिंग भाटिया वय ५५ वर्ष राहणार देवरी ९) सपुरणसिंग अवतारसिंग भाटिया वय ६५ वर्ष राहणार देवरी हे ९ इसम ५२



तासपत्तीवर पैश्याची बाजी लावून हारजीतचा जुगार खेळ खेळतांना मिळून आले. सदर ९ इसमांचा पंचासमक्ष झडती घेण्यात आली असता त्यांचे ताब्यातून रोख रक्कम रु. १,२६,८५०/- , ४ मोटर सायकल, ११ अँड्रॉइड मोबाइल व जुगार खेळण्याचे साहित्य अशा एकूण ६,७०,२७०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपीना विचारपूस केली असता सदरचा जुगार हे विजय मडावी राहणार देवरी हा खेळवीत असल्याचे सांगितले. करिता आरोपी १) नदीम नईम शेख वय ४६ वर्ष राहणार देवरी २) अविनाशसिंग श्रीसंत बहादूर वय ३८ वर्ष राहणार बामणी चारभाटा छत्तीसगढ ३) राजेश ज्ञानीराम पटले वय ३२ वर्ष राहणार कन्हाळगाव देवरी ४) सज्जाद शफी पठाण वय ३४ वर्ष राहणार साखरीटोला सालेकसा ५) बालदीपसिंग निर्मलसिंग खानूजा वय ३४ वर्ष राहणार देवरी ६) जागेश्वर धनलाल कुत्तीर वय ४१ वर्ष राहणार मुल्ला ७) प्रतिमोल सुरेश डोंगरे वय २१ वर्ष राहणार सिंधीबीरी देवरी ८) जसविंदसिंग जोगेंदरसिंग भाटिया वय ५५ वर्ष राहणार देवरी ९) सपुरणसिंग अवतारसिंग भाटिया वय ६५ वर्ष राहणार देवरी १०) विजय मडावी राहणार देवरी यांचे विरुद्ध पोलीस ठाणे देवरी येथे पोहवा तुलसीदास लुटे नेमणूक एल.सी.बी, गोंदिया यांचे तक्रारी वरून अपराध क्रमांक १९१/२०२६ कलम १२(अ ) महाराष्ट्र (मुंबई) जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गुन्ह्याचा पुढील तपास वरिष्ठांचे निर्देश सूचना प्रमाणे पोलीस ठाणे देवरी पोलीस करीत आहेत..सदरची दर्जेदार धाड कारवाई मा.पोलीस अधिक्षक श्री. गोरख भामरे, श्री अभय डोंगरे, अपर पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचे निर्देशान्वये पोलीस निरीक्षक श्री. पुरुषोत्तम अहेरकर ,एल.सी.बी, गोंदिया यांचे मार्गदर्शनात पोहवा तुलसीदास लुटे, दिक्षीतकुमार दमाहे, संजय चौहान , प्रकाश गायधने, सुबोध बिसेन, इंद्रजित बिसेन, भोजराज बहेकार, पो.शि. सुनील डहाके, राकेश इंदूरकर, छगन विठ्ठले, एल.सी.बी, गोंदिया यांनी केली आहे.

# अभंग निरूपण

निरूपणकार : ह.भ.प. तुळशीराम लबडे महाराज, अहिल्यानगर

### अभंग :

१. जेऊणियां हातीं देवें दिधली वाटी ।
आला उठाउठी नामा घरा ॥१॥

२. गोणाई म्हणे रे ऐक नामदेवा ।
नैवेद्य आणावा माझे हातीं ॥२॥

३. तेव्हां नामदेवें हातीं दिधली वाटी ।
पाहूं गेली दृष्टी रिकामी ते ॥३॥

४. काय तुज घरीं उणें होतें अन्न ।
नैवेद्य आपण तेथें खावा ॥४॥

५. ते दोघे बोलतां दामासेटी आला ।
पुसे त्या दोघांला काय गुह्य ॥५॥

६. देखियेलें नाहीं नाहीं ऐकियेलें ।
ऐसें ॥ सांगितलें नामदेवें ॥६॥

७. दामासेठी म्हणे आतां असों द्यावें ।
सकाळीं पहावें प्रचीतीस ॥७॥


संत नामदेव महाराज

### शब्दार्थ :

- उठाउठी – तातडीने, लवकर
- उणे – कमी
- गुह्य – गुपीत
- प्रचीती – अनुभव

### आशय :

भक्तासाठी देव कोणतेही कामे करतो. त्याची ईच्छा पुर्ण करतो.

### भावार्थ :

१. पांडुरंगा ने महाराजांनी आणलेला नैवद्य खाल्ला आणि रिकामी वाटी नामदेव महाराज कडे दिली. ती वाटी घेऊन नामदेव लगेच घरी आला.

२. गोणाई माता म्हणू लागली नामा ऐक नैवद्य दाखवून आलाना. दाखवलेला नैवद्य माझ्या कडे दे.

३. माते कडे नामाने वाटी दिली . माता पाहते तर वाटी रिकामी आहे.

४. रिकामी वाटी पाहून गोणाई माता नामदेवस म्हणू लागली . तुला घरी खायला अन्न नाही का तु खुशाल देवाचा नैवद्य खाल्लास.

५. नामदेव आणि गोणाईमात बोलत असताना दामाशेट तेथें आले. दोघांना विचारू लागले काय गुपित चालले. मातेने हकिकत सांगितली.

६. गोणाई सांगु लागली कोणी कधीच कोणी पाहिले नाही, कधीच कोणी ऐकले नाही. अशी गोष्ट नामदेव मला सांगत आहे.

७. दामाशेटी यांचे सर्व प्रकार लक्षात येताच ते म्हणाले , आता राहुदे सकाळी पाहू. नामदेवास सकाळी पुन्हा नैवद्य दाखवयास पाठवू . आणि मग प्रत्यक्ष अनुभव घेऊन सत्य असत्य पाहू.

### शिकवण :

✍ देवावरील विश्वास काय असतो तो नामदेव भक्तीतून कळते.

✍ मुलगा भक्त असेल तर पित्यास देव प्रत्यक्ष पाहता येतो. पण

✍ भक्ती, श्रद्धा आणि विश्वास यामुळे देव भक्ताच्या हाकेला धावून येतो.

# इतिहासातून वाद नाही तर बोध शोधावा

इतिहास हा प्रेरणा निर्माण करणारा स्तोत्र असतो म्हणून इतिहासातून बोध शोधाला पाहिजे आणि तो शोधता आलाच पाहिजे पण दुर्दैवाने आपण बोध सोडून वाद शोधतो आणि बोधापासून वंचित राहतो.जशी आपली दृष्टी असते तशी आपल्याला सृष्टी जाणवते दिसते हे अगदी सत्य आहे.वातावरण निर्मिती करून सनसनाटी निर्माण करत चुकीच्या पद्धतीने मांडणी करून स्वतःच व्यक्तिमत्त्व लोकांच्या नजरेस आणणं हा जरी संवग लोकप्रियतेचा एक भाग असला तरी पण हा प्रकार म्हणजे फार काही नाही तर क्षणिक समाधान प्रकार ठरू शकतो.यामधुन फार काही साध्य होत नाही कारण याचा पाया मजबूत नाही.जिथे पाया मजबूत नाही तिथे इमारत भक्कम कशी असेल म्हणून हि पद्धत अथवा प्रकार म्हणजे वैचारिकता ठरत नाही.मान्य करण अथवा न करण हा व्यक्तिगत प्रश्न असतो.वैचारिकता हि विराट असते. सत्य शोधण सत्याचा वेध घेणं आणि घटनेतील घडामोडी मधील बोध शोधण म्हणजे वैचारिकता असते. एखादा विषय चुकीच्या पद्धतीने मांडणी करून सार्वजनिक करणं अथवा वास्तव सत्य शोधून बोध पुर्ण मांडणी करणं हा ज्याचा त्याचा व्यक्तिगत तथा व्यक्तिस्वातंत्र्याचा त्याच बरोबर दृष्टीचा भाग आहे अधिकार आहे म्हणून त्याचा दुरूपयोग करणं स्वहित अथवा व्यापक समाजहित साधणारे नाही. लोकांनी काय स्वीकारलं पाहिजे हे महत्वाचं आहे.लोक चुकिच स्वीकारत असल्याने चुकीच्या पद्धतीने मांडणी होतेय असंच काहीसं चित्र साध्य दिसतं आहे.ज्यावेळी सर्वसामान्य लोक जागृत होतील आणि सत्य स्वीकारतील त्यावेळी असत्य आपोआप मागे पडेल या मध्ये शंका नाही.इतिहास हा नेहमीच विचारवंत जन्मला घालत असतो. कारण सत्य शोधण्यासाठी बुद्धीचा कस लागतो.इतिहास हा बोध शोधुन पुढे जाण्यासाठी असतो पण हल्ली बोध शोधण्या ऐवजी इतिहासावर वाद कसा निर्माण करता येईल हाच खास आणि विशेष प्रयत्न होताना दिसतो आहे.हा वाद निर्माण करणं खरंच गरजेचं आणि हितार्थ आहे का ?तर वास्तविक विचार केला तर हे अजिबात हितार्थ नाही.इतिहासाची सोनेरी पानं हि नवीन पिढीसाठी दिशा दर्शक बोध घेण्यासाठी असतात. ऐतिहासिक घटना कोणतीही असो कशीही असो ती त्या वेळेच प्रतिक असते.प्रत्येक घटनेत एक बोध लपलेला दडलेला असतो.तो बोध शोधणारा जाणकार असतो. इतिहासातील ऐतिहासिक घटना या मध्ये जो काही वास्तविक बोध दडलेला असतो.तो मुख्य बोध हेरता आला पाहिजे.घटना कोणतीही असु द्या त्या मध्ये जीवन बदलणारा घडवणारा बोध हा नक्कीच असतोच.पण आपण बोध शोधण्या ऐवजी त्या मध्ये वाद शोधतो आणि त्या वरून वाद कसा निर्माण होईल हाच मुख्य प्रयत्न करतो म्हणून इतिहासाची उपलब्धी ज्यामध्ये बोध मिळणार आहे त्यापासून आपण वंचित राहतो.आणि आपले समर्थक हितचिंतक आणि आपल्याशी जोडलेल्या संबंधीतांना देखिल वंचित ठेवतो.सत्य वास्तव हे समाज घडवणार असतं पण आजकाल सत्य घडविण्यासाठी फार प्रयत्न होत नाहीत.सत्य शोधण्यासाठी खुप कष्ट घ्यावे लागतात हि कष्ट घेण्याची सवय दिवसेंदिवस लुप्त होत चालल्याने सत्या पासुन दुर राहण्यास जास्त पसंती आहे.असत्य सहज उपलब्ध असतं त्यासाठी फार काही यत्न, प्रयत्न करावे लागत नाहीत म्हणून असत्याला मोठी पसंती मिळताना दिसत आहे.पण खरया अर्थाने त्यामधुन होणारा लाभ हा शुन्य असतो.प्रबोधन हे जागृती साठी असतं.प्रबोधन सत्य शाश्वत असेल तर होश जागृती निर्माण होते.आणि उलटपक्षी असत्य पाया असेल तर सगळीकडे बेहोशी निर्माण होईल. मग बहोशी असताना काय उत्कर्ष घडेल. बहोशी हि कधीच हितकारक नसल्याने अंतिमतः निरूपयोगी ठरेल. या मध्ये मग नेमका दोष कोणाचा आहे याचा विचार केला तर आपण चुकीचं पचवतो म्हणून आपल्याला ते त्या पद्धतीने खाऊ घातलं जातं ज्या दिवशी आपण चुकीचं पचवणार नाही त्या दिवशी पासुन चुकीचं खाऊ घालणं आपोआप बंद होईल. वैचारिक प्रगल्भता विवेकशील वृत्ती आणि जागृत अवस्था हि सदैव क्षणोक्षणी असली पाहिजे.आपली जागृती हिच महत्वपूर्ण आहे.आपण जागृत असु तर असत्य आपोआप गायब होईल आणि जितकं सत्य आहे तेच समोर येईल आणि सत्य समोर आल्यावर त्या पासुन आपला उत्कर्ष नक्कीच होईल.वास्तविक असत्य हे कोणासाठी हि लाभदायी नसतं.ते क्षणिक असल्याने भ्रमक,आकर्षक, सुंदर भासत पण शेवटी ते तसं नसतं म्हणून सत्य स्वीकारलं पाहिजे.इतिहास हा कसाही असला तरी त्या मधील बोध शोधुन तो स्वीकारण्यासाठी असतो.म्हणून त्यामध्ये मिळणारा बोध हा आपल्या जीवनात जीवन हितार्थ असतो.पण आपण हितार्थ बोध घेण्या ऐवजी चुकीच्या पद्धतीने मांडणी करून त्या मध्ये वाद शोधतो.

इतिहासात बोध शोधला तर निश्चितच उत्कर्ष लाभ होईल आणि वाद शोधला तर हानी निश्चित आहे.काय शोधायचं काय घेयच हे आपल्याला समजलं पाहिजे.

**गणेश खाडे**

# “घोषणांमधून शाश्वतता निर्माण होत नाही”

## घरातील एका साध्या निरीक्षणातून विजयकुमार कट्टी यांनी उभी केली ‘आशायें’ ही संकल्पना

वेसॅकइंडियाच्या माध्यमातून समुदाय सहभागावर आधारित एक उपक्रम आज आपल्या आसपास पर्यावरणाशी संबंधित संदेश सतत दिसत असतात. “पाणी वाचवा”, “प्लास्टिक टाळा”, “हरित भविष्यासाठी पुढे या” अशा घोषणा रस्त्यांवरील फलकांपासून शाळा, सोशल मीडिया, सरकारी मोहिमा आणि सार्वजनिक कार्यक्रमांपर्यंत सर्वत्र दिसतात. लोक हे संदेश समजूनही घेतात आणि त्यांच्याशी सहमतही असतात. तरीसुद्धा पर्यावरणीय समस्या मात्र दिवसेंदिवस वाढताना दिसतात. हाच विरोधाभास वेसॅकइंडियाचे संस्थापक विजयकुमार कट्टी यांना सतत विचार करायला भाग पाडत होता.

कट्टी यांच्या मते समस्या जागरूकतेच्या अभावाची नाही. त्यांच्या मते लोक पर्यावरणाचे संदेश वारंवार ऐकतात, पण त्या संदेशांचा स्वतःच्या आयुष्याशी असलेला संबंध अनुभवत नाहीत. जागरूकता आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्यामधील हे अंतरच वर्तनात्मक बदल मंदावण्याचे एक मोठे कारण आहे.

विशेष म्हणजे ‘आशायें’ ही संकल्पना कोणत्याही परिषदेत किंवा संशोधन संस्थेत जन्माला आलेली नाही. तिची सुरुवात एका सामान्य घरातून झाली. कट्टी यांनी आपल्या घरात आणि आसपासच्या अनेक घरांमध्ये एक गोष्ट शांतपणे वाढताना पाहिली. एनडब्ल्यूपीपीच्या पुनर्वापर करता येणाऱ्या पिशव्या कपाटांमध्ये, शेल्फमध्ये आणि स्टोरेजच्या कोपऱ्यांमध्ये साचत चालल्या होत्या. लोक त्या लगेच फेकून देत नव्हते, पण त्यांचा योग्य वापरही होत नव्हता. त्या पिशव्या घरातील इतर वस्तूंप्रमाणे फक्त अस्तित्वात राहिल्या होत्या.

सुरुवातीला हे फक्त घरातील एक सामान्य निरीक्षण वाटत होते. पण हळूहळू कट्टी यांना जाणवले की ही केवळ पिशव्यांची गोष्ट नाही, तर आधुनिक उपभोग संस्कृतीचे एक शांत चित्र आहे. ते याची तुलना जुन्या मोबाईल चार्जरशी करतात. आपण ते घरात ठेवून देतो कारण ते अजूनही उपयोगी पडतील असे वाटते, पण त्यांच्या मागे दडलेले संसाधन आपण कधी विचारात घेत नाही. त्याचप्रमाणे त्या पिशव्यांच्या मागेही कच्चे तेल, औद्योगिक पाणी, वीज, वाहतूक व्यवस्था, मानवी श्रम आणि पर्यावरणीय खर्च दडलेला आहे, हे त्यांना जाणवू लागले.

यातून त्यांना एक महत्त्वाची गोष्ट समजली. पर्यावरणाचा ऱ्हास नेहमी एखाद्या मोठ्या चुकीमुळेच होत नाही. तो अनेकदा लाखो लोकांच्या छोट्या आणि नकळत होत राहणाऱ्या सवयींमधून हळूहळू वाढत जातो. हाच विचार पुढे जाऊन ‘आशायें’ या उपक्रमाचा पाया ठरला.




अनेक जनजागृती मोहिमा फक्त सूचना देण्यापुरत्या मर्यादित राहतात. मात्र ‘आशायें’ लोकांना प्रत्यक्ष सहभागी करून घेण्याचा प्रयत्न करते. कट्टी यांचा ठाम विश्वास आहे की माणूस पर्यावरणाची जबाबदारी तेव्हाच खऱ्या अर्थाने समजतो, जेव्हा तो स्वतः त्या प्रक्रियेत सहभागी होतो. म्हणूनच हा उपक्रम “वापरानंतर विल्हेवाट” याऐवजी “विल्हेवाटीपूर्वी पुनर्वापर” या विचारावर भर देतो.

या संकल्पनेची मुळातली कल्पना अतिशय साधी आहे. घरात आधीपासून असलेल्या पुनर्वापरयोग्य एनडब्ल्यूपीपी पिशव्या जबाबदारीने गोळा करणे, स्वच्छ करून पुन्हा वापरासाठी तयार करणे आणि त्यांना अर्थपूर्ण पुनर्वापर व्यवस्थेकडे वळवणे. कट्टी यांच्या मते हा उपक्रम केवळ पिशव्यांबद्दल नाही. तो माणसांच्या संसाधनांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात बदल घडवण्याचा प्रयत्न आहे.

ही कल्पना समजावून सांगताना ते एका गळणाऱ्या नळाचे उदाहरण देतात. नळातून पडणारा एक थेंब निरुपद्रवी वाटू शकतो. पण तोच थेंब दिवस-रात्र गळत राहिला तर हजारो लिटर पाणी नकळत वाया जाते. त्यांच्या मते आपल्या उपभोगाच्या सवयी देखील अशाच असतात. एक अनावश्यक पिशवी फार मोठी समस्या वाटत नाही. एक निष्काळजी खरेदी क्षुल्लक वाटते. पण जेव्हा लाखो लोक हेच वर्तन दररोज पुन्हा पुन्हा करतात, तेव्हा त्याचा पर्यावरणावर प्रचंड परिणाम होतो.याच प्रक्रियेत “पाणी वाचवा” या घोषणेचा अर्थही त्यांच्या दृष्टीने बदलला. पूर्वी त्यांना वाटत असे की पाणी वाचवणे म्हणजे फक्त नळ बंद ठेवणे किंवा थेट पाण्याची नासाडी टाळणे. पण नंतर त्यांना जाणवले की आपल्या आजूबाजूच्या जवळपास प्रत्येक वस्तूमध्ये पाणी अप्रत्यक्षपणे गुंतलेले असते. प्लास्टिक उत्पादनासाठीही औद्योगिक पाणी, ऊर्जा, कूलिंग सिस्टिम्स आणि इंधन लागते. म्हणजेच अनावश्यक प्लास्टिकचा वापर कमी करणे हे अप्रत्यक्षपणे पाण्याची बचत करणेच आहे. त्यांच्या मते हा अदृश्य संबंध सामान्य लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाही. म्हणूनच ‘आशायें’ केवळ घोषणांवर नाही तर प्रत्यक्ष समुदाय सहभागावर भर देते. या उपक्रमाच्या विकासामधील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे एका घरातील फक्त पन्नास पुनर्वापरयोग्य पिशव्या योग्य पुनर्वापर व्यवस्थेत वळवल्यास काय परिणाम होऊ शकतो, याचा त्यांनी केलेला विचार. त्याक्षणी शाश्वतता ही केवळ सैद्धांतिक कल्पना न राहता मोजता येण्याजोगी वास्तवता बनली.या उपक्रमाशी संबंधित पर्यावरणीय मूल्यांकनानुसार अशा सहभागातून हजारो सिंगल यूज प्लास्टिक पिशव्यांच्या वापराशी संबंधित गैरवापर टाळण्यास मदत होऊ शकते. त्याचबरोबर प्लास्टिक कचरा कमी होणे, पाण्याची बचत, ऊर्जेचा कार्यक्षम वापर, कार्बन उत्सर्जनात घट आणि संसाधनांचे संवर्धन यांसारखे परिणामही दिसून येतात. मात्र कट्टी यांच्या मते सर्वात मोठा बदल मानसिक पातळीवर घडतो.

त्यांच्या मते जेव्हा लोक स्वतः वस्तू गोळा करतात, स्वच्छ करतात, वर्गीकरण करतात आणि पुनर्वापरासाठी पुढे देतात, तेव्हा कचऱ्याकडे पाहण्याची त्यांची दृष्टी बदलते. वस्तू तीच राहते, पण त्या वस्तूशी जोडलेली मानवी समज बदलते.

कट्टी यांना असेही वाटते की शाश्वतता ही केवळ सरकार, उद्योग किंवा पर्यावरण तज्ज्ञांची जबाबदारी राहू नये. अनेक पर्यावरणीय समस्या सामान्य माणसाच्या रोजच्या वर्तनातूनच निर्माण होतात. त्यामुळे त्यांची उत्तरेही समाजाच्या दैनंदिन जीवनातूनच शोधली गेली पाहिजेत.वेसॅकइंडिया आणि ‘आशायें’च्या माध्यमातून त्यांचा उद्देश परिपूर्णता निर्माण करणे नाही, तर विचारांना चालना देणे आहे. लोकांनी स्वतःला प्रश्न विचारावेत — आपण नकळत काय वाया घालवत आहोत, कोणती वस्तू पुन्हा वापरता येऊ शकते, आणि आपल्या छोट्या सवयींचा मोठ्या पर्यावरणीय व्यवस्थेशी काय संबंध आहे.कट्टी यांच्या मते शाश्वतता तेव्हाच अर्थपूर्ण बनते जेव्हा माणूस हे संबंध स्वतः अनुभवातून शोधतो.